म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा-वा.
दा. क्र. 2808
BVBK-0402807

# पण जेव्हा होता होता..

## सौ. क्षमा लिमये.



BVBK-0402807

✧ प्रकाशिका
सौ. वीणा तिजारे
मंगल प्रकाशन
पोस्टल ऑडिट को. हौ. सो. फ्लॉट
तोरणे हास्पिटल समोर
नागपूर १०

✧ मुद्रक
प्रभाकर धाक्रस
सूर्य आफसेट
रामदास पेठ,
नागपूर १०

✧ प्रथमावृत्ती १९९०

© सर्वाधिकार मंगल प्रकाशन

प्रिय छोटयांनो,

'पपा जेव्हा छोटा होता' हे पुस्तक मी कसे लिहिले हे तुम्हाला मी पहिल्यांदा सांगणार आहे. मला सुस्मित नावाचा एक छोटा नातू आहे. तो सुटीमधे आपल्या आईबरोबर त्याच्या गावाहून आमच्याकडे येत असे. त्यावेळी त्याला त्याच्या पपाची अधूनमधून आठवण यायची विशेषतः रात्री. कारण पपा त्याला झोपतांना बरेच वेळा गोष्टी सांगत असे. मग अशा वेळी मी त्याला त्याच्या पपाच्या लहानपणाच्या गोष्टी सांगत असे. त्या त्याला खूप आवडायच्या. आपलाही पपा पतंग, भोवरा, कंचे असले खेळ खेळत होता, बालक मंदिरात जात होता, कसा गमतीदार बोलत होता, हट्टी करीत होता हे ऐकून त्याला खूप मजा वाटायची. मग तोच मला पुष्कळ वेळा आग्रह करीत असे 'आजी, जेव्हा पपा छोटा होता तेव्हाच्या त्याच्या लहानपणच्या गोष्टी सांग ना!'

एका सुटीमधे तो अलेक्झँडर रस्कीनचे 'When Daddy was a Little boy' हे पुस्तक घेऊन आला. त्याने ते पुस्तक मला दाखविले त्यातल्या बऱ्याचशा गोष्टी मी वाचल्या आणि त्यानेही वाचून दाखविल्या आणि तो मला म्हणाला, 'माझा पपा छोटा होता तेव्हाच्या तू मला गोष्टी सांगतेस ना तशाच ह्या' पण आहेत की नाही?

आणि मी सुस्मितचा पपा, म्हणजे माझा मुलगा, जेव्हा छोटा होता तेव्हाच्या निवडक प्रसंगावरील गोष्टी प्रथम सुस्मितला सांगितल्या व नंतर लिहून काढल्या. ह्यातल्या काही गोष्टी पपाच्या साधारण समवयस्क मित्रांच्या लहानपणच्या आहेत. ते मित्र त्यांच्या लहानपणापासून माझ्या चांगल्या परिचयातले आहेत आणि ते पण आता पपा झाले आहेत. अशा छोट्या छोट्या घटना मुलांच्या बाबतीत घडतातच. त्या काही मी नव्याने शोधून काढल्या नाहीत. पण त्यातील निवडक घटना मी गोष्टींच्या स्वरूपात सांगितल्या आणि लिहून काढल्या. मला असं वाटलं की पपा छोटे असतांना त्यांच्या लहानपणी काय घडलं हे समजून घ्यायला, त्यांच्या गोष्टी ऐकायला त्यांची मुलं आणि इतरही लहानमोठी माणसं उत्सुक असतील आणि त्यांना त्या आवडतील.

तुमची

आजी

(क्षमा लिमये)

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | पपाचा दुधाचा कप | ५ |
| २. | पपाचा वेडा ससा | ७ |
| ३. | पपा जेवायला वाढतो | ९ |
| ४. | पपा बालक मंदिरात जातो | १२ |
| ५. | पपा गॅदरींगमध्ये गोष्ट सांगतो | १४ |
| ६. | पपाचे नामांकित इंग्लीश | १७ |
| ७. | पपाचा पहिलम् प्यारा | १९ |
| ८. | पपा रस्त्यात हरवतो | २१ |
| ९. | पपा आठ आणे वाचवतो | २४ |
| १०. | पपा आणि शंकरपाळे | २६ |
| ११. | पपा पतंग उडवतो | २८ |
| १२. | पपा पोहायला जातो | ३१ |
| १३. | पपा अभ्यासत्तेर कार्यक्रम | ३३ |
| १४. | पपाची रामटेक सहल | ३७ |
| १५. | पपाची चित्रकला | ४१ |
| १६. | पपाची रांगोळी | ४४ |
| १७. | पपा झाड़ लावतो | ४६ |
| १८. | पपाच्या बागेतील नाविण्यपूर्ण झाडे | ४९ |
| १९. | पपा फुग्यांशी खेळतो | ५१ |
| २०. | पपाची हटवादीपणा | ५४ |
| २१. | पपाची सायकल रेस | ५८ |
| २२. | पपाची मुंज | ६१ |
| २३. | पपा जेव्हा छोटा होता | ६४ |
| २४. | पपा शाळेत जातो | ६८ |
| २५. | पपा किल्ला बांधतो | ७१ |
| २६. | पपा कुत्रं पाळतो | ७४ |
| २७. | पपा मुलीत लांबोडा | ७७ |

# पपाचा दुधाचा कप

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊


पपा कपाने दूध प्यायला लागल्यापासून तो त्याच्या एका विशिष्ट कपानेच दूध प्यायचा. त्याला दुसरा कप चालत नसे. त्याच्या कपावर दूध पिणाऱ्या एका सुंदर कुत्र्याचं चित्र होतं आणि तो कप त्याला त्याच्या आजोबांनी दिला होता. कधी कधी तो दूध प्यायला खूप खळखळ करायचा खूप वेळ लावायचा तेव्हा त्याची आई त्याला म्हणत असे 'तुझ्या कपावरचा भू भू बघ, कसा पटपट दूध पितोय, ते संपल की तो तुझ्या कपातल सुध्दा दूध पिऊन टाकील. तू पण पटपट पी बरं!'

मग तो दुधाचा कप पटकन तोंडाला लावायचा अन् मधेच म्हणायचा 'भूभू दूध पितो, मी दूध पितो' असं म्हणत ते दूध संपवून टाकीत असे.

पपा थोडा मोठा झाला तरी त्याला त्याचा तोच स्पेशल कप लागत असे. कुणाकडे गेला अन त्याची दूध प्यायची वेळ झाली तरी तो दुसऱ्या कपाने दूध पीत नसे. कोणी त्याला फुलाफुलाचा किंवा नक्षीचा कप देत पण त्याला त्याचा भूभूचाच कप हवा असे. त्यामुळे आईला कुणाकडे बराच वेळ जायचं असलं किंवा गावाला वगैरे जायचं असलं तर तो स्पेशल कप बरोबर घेऊन जावू लागे आणि तो नीट सांभाळून ठेवावा लागे. अलीकडे मुलांना बाटलीने दूध प्यायची सवय असली तर ती जशी लवकर सुटत नाही आणि त्याकरता काहीतरी युक्ती करावी लागते तसंच काहीसं पपाच्या बाबतीत झालं होतं. एकच युक्ती सर्व मुलांच्या बाबतीत लागू होतेच असंही नाही. त्या करता वेगवेगळे प्रयोग करून पहावे लागतात.

एक दिवस गंमतच झाली. उन्हाळ्याचे दिवस होते. सर्वजण रात्री पलंगावर अंगणात झोपले होते. त्या दिवशी पपा पहाटेच जागा झाला. आणि आईला दूध मागू लागला. आईने त्याच्या कपाने त्याला दूध दिले आणि तो कप तिथेच बाजुच्या स्टूलावर ठेवला. थोडया वेळाने एक कुत्रा तिथे आला आई त्याल 'हड हड' करून हाकलीतच होती पण तेवढ्यात कुत्र्याचा त्या कपाला धक्का लागला. तो खाली पडला, आणि फुटला. पपाने ते पाहिले त्याचा कप फुटला म्हणून त्याला रडायला आलं. पण आईने त्याची

कशीबशी समजूत घातली तो अर्धवट झोपेतच होता तो पुन्हा झोपला व थोडया वेळाने उठला.



पपाची पुन्हा दूध प्यायची वेळ झाली तेव्हा आईने त्याला दुसऱ्या कपात दूध दिले पण तो दूध पिईना. फुलाफुलाचा कप देऊन पाहिला पण तो त्याला आवडेना. त्याला त्याचा भूभूचे चित्र असलेलाच कप हवा होता. शेवटी आईने त्याला त्याचा त्याचा भूभूचा कप सकाळी एका भूभूनेच कसा फोडला ते सांगितलं आणि फुटलेला कप दाखविला. त्याला ते आठवलं आणि मनापासून वाईट वाटलं. पण मग मात्र त्याने फुलाच्या कपाने दूध प्यायले त्याची विशिष्ट कपानेच दूध प्यायची सवय एकदम बदलली. नंतर त्याला कोणताही कप चालत असे. तो इतरांना सांगत असे 'माझा भूभूच्या चित्राचा दूधाचा कप भूभूने फोडला'

तीस वर्षानंतर त्या पपाच्या मुलाची बाटलीची सवय तोडण्याकरता भूभू ऐवजी 'माऊ ने बाटली फोडली' हा प्रयोग यशस्वी झाला. कारण त्यांच्या घरी 'माऊ' नेहमीच येत असे त्याने फुटलेली बाटली पाहिली आणि तो मग बाटली ऐवजी कोणत्याही कपाने दूध पिऊ लागला.

# पपांचा वेडा ससा

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

पपा जेव्हा छोटा होता तेव्हा तो काही दिवस जबलपूरला होता. त्याच्याकरता त्याच्या आईनें नागपूरहून एक कापडी पांढरा शुभ्र, गुबगुबीत मोठ्ठा ससा खेळणं म्हणून आणला होता. त्याला तो खूप आवडायचा त्याचे तो खूप लाड करीत असे. त्याचे लाल डोळे, छोट्टीशी शेपूट, मोठ्ठे कान त्याला खूप आवडायचे त्याला कडेवर घेऊन तो सगळीकडे मिरवीत असे आणि आईने शिकविलेलं गाण म्हणत असे-

*ससा ससा दिसतो कसा*
*पिंजलेल्या कापसाचा गोळा जसा*
*खाऊ खाऊन फुगतो टुम*
*तुम्हाला पहाताच पळतो धुम*

असं म्हणून सशाला घेऊन तो स्वतःच धुम पळत सुटायचा

तिसरं आणि विसरं म्हणतात. म्हणजे ह्याचा अर्थ असा की तिसऱ्या वर्षी मुलं जरा जास्तच हट्ट करतात कारण तेव्हा ती अगदी छोटीही नसतात पण मोठीही झालेली नसतात. घटकेत आई त्याला म्हणते 'तू लहान आहेस ना, तुला चहा नाही मिळणार, तू दूध पी'. तर घटकेत त्याचे बाबा त्याला म्हणतात, 'अरे तू आता मोठा झालास ना तू आपल्या मनाने भात कालवून जेवीत जा' आणि मग त्या मुलाला प्रश्न पडतो आपण छोटे की मोठे? तो आपल्या सोईप्रमाणे स्वतःला कधी छोटे तर कधी मोठे ठरवतो आणि त्याप्रमाणे वागतो. छोट्या पपालाही वाटायचं आपले आईबाबा मात्र सकाळी दोनदोनदा चहा पितात अन् आपल्याला चहा आवडतो तरी एकदाही देत नाही. दुधाचाच आग्रह करतात. मग तोही चहाचा आग्रह धरायचा आणि हट्ट करायचा त्याचंही तिसरं वर्ष चालू होतं ना! .

आई बाहेर जायला निघाली की पपालाही वाटायचं आपण आईबरोबर

बाहेर जाव, पण, कुठे बाहेर गेलं की त्याला लगेच कंटाळा याचचा तो 'घरी चल, घरी चलं, म्हणून वेड्यासारखा हट्ट करायचा जवळ जायचं असलं तरी पायी न जाता कडेवर घ्यायला लावायचा त्याच्या हट्टामुळे आईला कधी कधी लवकर परत यावं लागे किंवा ती मग कधी कधी त्याला त्याच्या आजीजवळ घरीच ठेवून बाहेर जाई. एकदा आई बाहेर जायच्या वेळी तो काही तरी हट्ट करायला लागला. आई त्याच्यावर चिडली. त्याच्याच खेळण्यातली एक छोटीशी काठी घेऊन तिने त्याला मारल्यासारखं केलं आणि ती म्हणाली 'चांगला मार खायला हवा, वेड्यासारखा किती हट्ट करतोस?' ह्या सशाशी खेळत बस. मी लवकरच घरी येतेय, आणि ती बाहेर गेली. थोड्या वेळाने आई बाहेरून घरी येऊन पहाते तर हा पपा आपल्या आईचं अनुकरण करीत होता. सशाला काठीने मारल्यासारखं करून म्हणत होता 'अरे हट्ट करतोस? किती सारखा वेड्यासारखा हट्ट करतो. तू वेडा आहेस. तूला चागला मार दिला पाहिजे.' ते पहाताच आईने छोट्या पपाला चटकन कडेवर उचलून घेतलं. त्याचा पापा घेतला आणि त्याला म्हणाली, 'हा तुझा ससा वेडा आहे ना तो सारखा हट्ट करतो का? तू नाही ना त्याच्या सारखा हट्ट करीत? 'तू तर शहाणा आहेस' त्याला शहाणा म्हणल्या बरोबर तो खूष झाला.

आणि पुढे केव्हाही त्याला राग आला किंवा हटट करावा वाटला की तो त्या वेड्या सशाला काठीने मारण्याचा धाक दाखवून म्हणत असे 'अं, हटट करतोस, सारखा सारखा वेड्यासारखा हट्ट करतोस' किंवा पपाने हट्ट केला की त्याचे आई बाबा त्याला रागावण्या ऐवजी किंवा वेडा म्हणण्याऐवजी त्याच्या सशाला रागवत किंवा वेडा म्हणत असत. असा हा पपाचा वेडा ससा हा पपाला चांगला सवयी लावण्याकरता आणि शहाण्यासारखं वागण्याकरता मदत करीत होता पण नेहमी नाही हं, कधी कधी! एकच उपाय नेहमी नेहमी आणि सर्वत मुलांना उपयोगी पडत नाही हेच खरं! कारण पपाच्या वेड्या सशाचा उपाय त्याच्या धाकट्या भावाकरता मात्र उपयोगी ठरला नव्हता.

❋

# पपा जेवायला वाढतो


पपाला लहानपणी काल्पनिक खेळ खेळायला आवडत असे. तो तेव्हा जबलपूरला एका कॉलेज कॉलनीतील बंगल्यात रहात होता. शेजारी बरोबरीची मुलं किंवा मित्र फारसे नव्हते. घरीही लहान मुलं कोणी नव्हती. त्यामुळे त्याचे काल्पनिक मित्र असत. तो त्यांच्याशी कितीतरी वेळ बोलत बसे, खेळत असे. बाजुला बसून कुणी ऐकले तर ऐकणाऱ्याला वाटावे की तो खरोखरीच कुणा मित्राशी बोलतोय, खेळतोय!

त्याच्या घराच्या मागच्या बाजुला थोडचा दूरवर एक फॅक्टरी होती. त्या फॅक्टरीतून मधल्या सुटीत कामगार आपल्या घरी जेवायला त्याच्या घरासमोरच्या रस्त्यावरून धावत धावत जात असत. तेव्हा पुष्कळ वेळा तो घरासमोरच्या व्हरांड्यात काही तरी खेळत बसलेला असे. शेजारी आई काहीतरी वाचत किंवा स्वेटर वगैरे विणत बसलेली असायची तो त्या धावणाऱ्या माणसांना पहायचा त्याला वाटे हे लोक धावत धावत का चालले आहेत? हे कुठे चालले आहेत? हे कशाला चालले आहेत? एक दिवस त्याने त्यासंबंधी आपल्या आईला विचारलेच त्यावर त्याला आईने सांगितले की हे कामगार मधल्या सुटीत घरी जेवायला चालले आहेत. सुटीमधे घरी जाऊन जेवून यायला वेळ पुरेसा नसतो म्हणून ते धावत धावत जातात.

जेवणाकरता धावत घरी जायचं आणि पुन्हा धावत कामावर यायचं ही कल्पनाच त्याला कशीशी वाटली त्याच्या मनाला ती पटली नाही. आवडली नाही. त्याने मग अशा प्रश्नांवर प्रश्न विचारणे सुरू केलं की त्याची उत्तरं देणं आईला कठीण वाटलं! 'घरी येण्यापेक्षा कामावर जातांना हे घरून डबा का घेऊन जात नाहीत? शाळेत मुलं डबा नेतात की नाही?' 'अरे शाळेची गोष्ट वेगळी आणि ही वेगळी. शाळेत थोडसंच खायचं असतं, ह्यांना पूर्ण जेवायचं असतं. अशा वेळी खीर, आमटी, पातळ भाजी सारखे पदार्थ कुठे नेता येतात? नेतांना ते सांडतात. शिवाय ते गार होतात. थंडीमधे गार गार पदार्थ चांगले लागत नाहीत हो की नाही?'

'मग तिथे फॅक्टरीमधे त्यांचे मालक त्यांना जेवायला का देत नाही?'

'देतात ना! तिथे त्यांचं कॅन्टीन आहे तिथे ही सोय आहे पण ते पदार्थ घरच्यापेक्षा महाग पडतात. शिवाय त्यांच्या आवडीचे असतील असे नाही. म्हणजे पैसे जास्त देऊनही त्यांच्या आवडीचे पदार्थ त्यांना मिळत नसावे. म्हणून ही धावपळ!'



'मग फॅक्टरीच्या जवळ कुणीतरी कॅन्टीन काढावं त्यांना आवडणारे चांगले, गरम गरम पदार्थ तिथे तयार करावे आणि ते महाग नसावेत.'

'अरे तुझा हा विचार चांगला आहे पण असं कोण तयार होणार?' आईने विचारले त्यावर पपा म्हणाला-

'माझा विचार चांगला आहे ना मग मीच ते तयार करीन'

'पण मोठा झाल्यावर ना? मग पाहू तेव्हा काय करायचं ते!'

'नाही नाही मी आत्ताच तयार केले आहेत ना हे पदार्थ'

'मी इथे त्यांची ओळीने पानं मांडतो. या कामगारांनो या. इथे बसा आणि पोटभर जेवा.' त्याची स्वतःशीच बडबड चालू होती. सावकाश जेवा आता तुम्हाला लांब तुमच्या घरी जायचं नाही हे पहा मी पोळीचे गुळतूप घालून लाडू केले आहेत. मला ते खूप आवडतात तुम्हाला ही आवडतील शिवाय वरण, भात, भाजी, पोळी आहेच' असं म्हणून तो ओळीने पंगती

मध्ये बसलेल्या काल्पनिक कामगारांना आग्रहाने लाडू आणि इतर पदार्थ वाढायचा किती तरी दिवस दुपारी हा त्याचा खेळ चालत असे.

ह्यापूर्वी तो भातुकलीचा खेळ असा खेळला नव्हता. त्याने तो कुणाचा पाहिलाही नव्हता.त्यामुळे त्याकरता लहान लहान भांडी लागतात हे काही त्याला माहीत नव्हते. तरीपण त्याला कुणी चहा मागितला तर हुबेहुब आई सारख्या एक्शनस् तो करायचा. त्यावेळी स्टोवर चहा करीत असत तेव्हा स्टोला पंप करणं, पिन करणं व तो पेटवल्यावर एका काल्पनिक भांडयात चहाचं आधण कपाने मोजून ठेवण, नंतर चहा साखरेचे डबे शेल्फातून आणून चमच्याने मोजून आधणात टाकणं व ते डबे बंद करून जागेवर नेऊन ठेवण्याचा अभिनय तो फार सुंदर करायचा. मग चहा गाळून, त्यात दूध घालून सर्वांना खोटया खोटया कपबशातून तो चहा प्यायला द्याचया त्याच्या ह्या हालचाली पहायला गमत वाटायची.

भातुकलीचा खेळ पुष्कळ मुलं आणि विशेषतः मुली खेळतात तेव्हा तर हा खेळ बराच प्रचलीत होता. भातुकली मधे हळदी कुंकु, बाहुलीचे लग्न, शाळा शाळा हे खेळ हटकून खेळले जात असत. पुढे तोही आपल्या बहिणी बरोबर हे खेळ कधी कधी खेळला पण त्यावेळी तो मोठा होता. तेव्हा बाजारातून भाजी आणून देण्याचं काम त्याने केलं होते. शिवाय बाहुलीच्या लग्नात भटजीची भूमिका त्याने वठविली होती. पण तेव्हा खेळापेक्षा बहिणीचं आणि तिच्या मैत्रिणींचं लक्ष चुकवून त्यांचा खाऊ खाता कसा येईल ह्याकडे त्याचं आणि त्यांच्या मित्रांचं लक्ष असे. त्यावरून मग मुलं आणि मुली ह्यामधे वादावादी होत असे. कधी कधी त्याची गाऱ्हाणी आई पर्यंत येत आणि त्यांना ती मोठ्या कौशल्याने हाताळावी लागत.

पण ह्या खेळापेक्षा काल्पनिक कामगारांच्या पंगतीमधे पोळीचे लाडू आग्रहाने वाढणारा छोटा पपा ज्यांनी ज्यांनी पाहिला त्यांचा तो कौतुकाचा विषय होता. आणि तेव्हाची त्यांची छोटी मूर्ती अजूनही त्यांच्या लक्षात आहे.

# पपा बालक मंदिरात जातो

पपा आता तीन वर्षाचा झाला होता. त्याच्या बरोबरीची काही मुलं बालक मंदिरात जाऊ लागली होती. पपाच्या आईबाबांना वाटत होतं की पपालाही आता बालक मंदिरात घातलं पाहिजे पण बालमंदिर घरापासून थोड दूर होतं. शिवाय तो स्वभावने थोडा अबोल आणि लाजरा होता. घरात तेव्हा तो एकटाच लहान असल्यामुळे लाडोबाही होता. शाळेत तो कसा काय रमेल असं त्याच्या आईबाबांना वाटत होतं पण शाळेत त्याला घालायला हव तर होतंच. हळूहळू त्यांनी आपल्या आणि त्याच्याही मनाची तयारी केली आणि एका चांगल्यापैकी बालक मंदिरात घालायचं ठरवलं. तो त्यावेळी जबलपूरला नेपियर टाऊन मधे रहात असे आणि हे बालक मंदिर गोल बाजारात दत्त मंदिरा जवळ होते.

आईने त्याला एक दिवस त्या बालकमंदिरात नेलं आणि एका शिक्षिकेच्या स्वाधीन केलं. पहिल्यांदाच येणारी दोन तीन मुलं तिथे रडत होती ते पाहून त्यालाही रडू येत होतं. पण आईने त्याला घरी खूप पढवलं होतं की शाळेत असं रडायच नसतं. रडलं तर इतर मुलं हसतात चिडवतात. तिथे छान छान खेळायचं तिथल्या ताईनी सांगितलेल ऐकायच म्हणजे त्या शाबासकी देतात वगैरे वगैरे. त्यामुळे तो रडू आवरायचा खूप प्रयत्न करीत होता.

शिक्षिकेने पपाच्या आईला त्या दिवशी त्याचा शाळेचा पहिला दिवस असल्यामुळे त्याला शाळेतून घरी घेऊन जायला लवकरच बोलावलं होतं आईलाही त्याला तिथे एकटं ठेवतांना थोडसं वाईट वाटत होतं. त्याने आईचा पदर घटट धरून ठेवला होता अन् त्याच्या डोळ्यातून पाणी येत होतं. आपला पदर सोडवून घेत आई त्याला म्हणाली होती 'तुला घरी घेऊन जायला मी आज लवकर येतेय, रडू नकोस'. खरं म्हणजे असं म्हणतांना आईलाही गहिवरून आलं होतं पण तिने ते त्याच्या समोर दिसू दिलं नव्हतं. आईचा पदर सोडतांना तो म्हणाला होता- 'मी रडत नाहीये तरी पण माझ्या डोळ्यातून पाणी येतंय' त्याचं बोलणं ऐकून त्या शिक्षिकेलाही गमत वाटली. तिने

त्याचा हात धरून त्याला वर्गात नेलं आणि काहीतरी खेळणी खेळायला दिली.

बालक मंदिरातून परत घरी जातांना त्याला नेण्याकरता कधी त्याच्या बाबांना फुरसत मिळाली तर ते तिथे जात असत. मग पपा अगदी खूष असे. रस्त्याने शाळेतल्या गमती सांगत गाणी म्हणत तो परत येई. 'चम चम चांदणी गगनात- लुकलुक प्रकाश दरियात' हे त्यांचं आवडतं गाणं होतं. खूपसे हातवारे करून तो हे गाणं म्हणत असे. नाचही करीत असे. घरी कधी कधी तो गोंडाचा नाचही करून दाखवायचा. तो नाच म्हणजे नुसता धांगडाधिगाच होता पण त्याच्या मते तो एक छान नाच म्हणजे डान्स होता.

जेवतांना त्याला दुधसाखर पोळी मनापासून आवडायची भात खाल्ल्यावर तो दु.सा.पो.सा. म्हणजे दुध साखर पोळी साखर मागायचा. मधल्या वेळी पोळीचा गुळ तूप घालून केलेला लाडू त्याला खूप आवडायचा. असा लाडू शाळेच्या डब्यात द्यायलाही सोईचा असे पण ह्या शाळेचा मुळीच नियमच होता की शाळेतल्या डब्यात लाडू वगैरे असले पदार्थ द्यायचे नाहीत. पोळी भाजीच द्यायची. पोळीचे तुकडे मुलांना करता आले नाही तर घरूनच आईने करून द्यायचे किंवा शाळेत ताई करून द्यायच्या पण त्यामुळे मुलांना भाजी पोळी खायची सवय लागायची. पपा सुद्धा सर्व मुलांबरोबर आवडीने भाजी पोळी खाऊ लागला होता.

प्रार्थनेनंतर ताई मुलांना काही श्लोक सांगत असत. ते म्हणतांना मुलांना त्या डोळे मिटायला लावीत. ताईनी सांगितलं की ते ऐकायचं असतं ही पपाची कल्पना असल्यामुळे तो ते म्हणताना प्रामाणिकपणे डोळे मिटायचा. एक दिवस त्याला शेजारी बसलेल्या मुलाचा तेव्हा धक्का लागला म्हणून त्याने डोळे उघडून पाहिले तर तो चक्क डोळे उघडे ठेवून हातवारे करीत म्हणत होता. पपा त्याला हळूच म्हणाला 'डोळे मीट, डोळे मीट'

तो डोळे मिटेना तेव्हा पपाने त्याचे डोळे हाताने मिटाविण्याच्या खटपटीत त्याच्या डोळ्यात बोट गेलं. तो मोठ्याने रडायला लागला आणि ताईना सांगायला लागला की ह्याने डोळ्यात बोट घातलं त्यावर पपा लगेच म्हणाला.

'मी काही मुद्दाम बोट घातलं नाही डोळ्यात. हा डोळे उघडे ठेवून

श्लोक म्हणत होता. त्याचे डोळे मी मिटायला गेलो तर ह्याने मान हलविली. ताईचं आणि माझं ऐकलं नाही ना म्हणून देवाने शिक्षा दिली.'

दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी त्याच्या मित्राने ताईना सोनं म्हणून पान दिले. तो चुरगळलेलं होतं. पपाच्या घरी सोन्याचं झाड होतं. त्याने एक मोठं ताजं पान ताईना द्यायला आणलं होतं. ते त्याने मोठ्या ऐटीत ताईना देताच ताईनी त्याचं आणि त्या पानाचं कौतुक केलं त्याबरोबर त्याला अगदी धन्य वाटलं तान्ह्या पोळ्याला बैल सजवून न्यायचा असला की पपाची अगदी सकाळपासून गडबड असे. बैलाला रंग द्यायचा, शींगाला सोनेरी कागद आणि गोंडे, पाठीवर चंदेरी सोनेरी कागदाची झूल, गळ्यात फुलांच्या माळा घालून हा बैलाला मिरवीत शाळेत घेऊन जात असे.

थोड्याच दिवसात तो त्या बालक मंदिरात चांगला रमला. गोष्टी सांगू लागला आणि अभिनय करून गाणी म्हणू लागला. त्याची बडबड-गीतांची बडबड तर नेहमीच चालत असे.

# पपा गॅदरींग मधे गोष्ट सांगतो

पपाच्या बालक मंदिरात दरवर्षीच गॅदरींग करीत असत त्याची तयारी शिक्षिकांना खूप आधीपासून करावी लागे. काही मुलांची समूहगाणी तर काही मुलांची बडबड गीत काही मुलांच्या गोष्टी तर काही मुलांचे नाच असे कितीतरी विविध प्रकारचे कार्यक्रम बसवून द्यावे लागत. मुलांची आवड, गुण आणि कौशल्य विचारांत घेऊन त्याप्रमाणे त्यांची निवड केली जात असे. पपाचा स्वभाव लाजरा असला तरी वर्गामधे तो छान धीटपणे गोष्टी सांगत असे, म्हणून त्याने गॅदरींगमधे एक गोष्ट सांगायची असं ठरलं.

ताईनी त्याच्याकडून ती गोष्ट दोन तीन वेळा सांगून घेतली. ती सांगताना अभिनय कसा करायचा ते शिकविले. घरी आईसमोर त्याने ती गोष्ट ताईनी शिकविल्याप्रमाणे सांगितली, तसा अभिनयही केला आणि

आईला म्हटलं 'ही गोष्ट सांगतांना ताईनी मला असे हातवारे करायला सांगितलंय' त्याला अभिनय हा शब्द आठवला नाही पण त्याची गोष्ट सांगण्याची तयारी छान झाली होती.



गॅदरींगचा दिवस उजाडला. त्या दिवशी पपाची खूप गडबड चालू होती. बालक मंदिरात तो गेला तेव्हा नाचात काम करणाऱ्या काही मुलांचा मेकअप चालू होता. पपाला ही तिथे बोलवलं आणि त्याच्या तोंडाला खूपशी पावडर फासलं. गालाला लाल रंग आणि ओठाला लाल चुटक लिपस्टीक लावलं. गोष्ट सांगण्याच्या दृष्टीने वातावरण तयार झालं होतं. ह्या मुलांना स्टेजजवळ असलेल्या बाजुच्या खोलीत बसवलं होतं. ताईनी त्याला सांगितल होतं की त्याच्या मित्राने म्हणजे अजयने वाघोबांचं गाणं म्हणून दाखविलं की नंतर त्याने 'आजीने वाळत घातलेले सांडगे एक कावळा कुडुम कुडुम कसा खातो' ही गोष्ट सांगायची.

अजयला गाणं म्हणायला स्टेजवर नेलं आणि पपा नेमका त्यावेळी पाणी प्यायला अंगणातल्या नळावर गेला. बाहेर लोकांची गर्दी पाहून ऐनवेळी अजय घाबरला आणि गाणं न म्हणताच आतमधे पळाला.

## ॥ १६ ॥ 'पपा जेव्हा छोटा होता'

शिक्षिका मग पपाला गोष्ट सांगण्याकरता बाहेर बोलावू लागली तर हा जागेवरच नव्हता. कुठे गेला म्हणून शोधाशोध केली तर शटविर पाणी सांडत नळावर पाणी पीत होता. तसच त्याला स्टेजवर नेतांना त्याच्या ताई त्याला म्हणाल्या 'लवकर बाहेर चल, तुला कावळ्याची गोष्ट सांगायची आहे ना? तू आता कशाला पाणी प्यायला बाहेर गेलास?'

'मला तहान लागली होती अजयने गाणं म्हटल्यावर मला गोष्ट सांगायची आहे ना त्याने गाणं म्हटलं नाही तर आत मी पण गोष्ट सागणार नाही'

ही लहान मुलं ऐनवेळी कसं वागतील ह्याची खात्री देणं कठीणच! कार्यक्रमातली मुलं काहीच न बोलता स्टेजवरून परत येत. शाळेच्या दृष्टिणं ठीक नव्हतं. अन् त्यांचा कार्यक्रम बसवून तो स्टेजवर करून घेणं हे कामही सोपं नव्हतं. शेवटी त्या शिक्षिकेने त्याची बरीच समजूत घातली त्याची तारीफ केली तेव्हा हा स्टेजवर आला. तेथे आल्यावर मात्र त्याने धीटपणाने कुठेही न चुकता सर्व गोष्ट सुरेख सांगितलं त्याच पाठांतर छान होतं. गोष्टी, गाणी, श्लोक, पाढे वगैरे त्यांच चटकन पाठ होत असे. त्याचे उच्चार स्पष्ट होत. ताईनी शिकविल्याप्रमाणे सर्व गोष्ट त्याने छान सांगितली, अभिनय केला, त्यामुळे त्याने शाबासकी आणि बक्षिसही मिळविलं.

गॅदरींगमधे काम केलेल्या सर्व मुलामुलींचा ताईनी ग्रुप फोटो काढला होता. पपाच्या आईने कौतुकाने तो विकतही घेतला होता. इतक्या मुलांमधे पपाचा चेहरा एखाद्या ठिपक्याएवढाच दिसत होता. तिथे तो उभा होता हे माहीत होत म्हणून तो त्याचा फोटो अणायचं म्हणूनच एरव्ही तो ओळखता येणं कठीण होतं. पण सार्वजनिक कार्यक्रमात स्टेजवर माईक समोर उभे राहून गोष्ट सांगायची त्याची पहिलीच वेळ होती.

आणि ह्या दृष्टीकोनातून त्या प्रसंगात आणि फोटोचे महत्व होताच तो फोटो त्यांनी अजूनही जपून ठेवला आहे.

# पपाचे नामंकित इंग्लीश

पपा एकदा त्याच्या आईबाबांबरोबर एका नातलगांकडे लग्नाकरता दुसऱ्या गावी अकोल्याला गेला. लग्न घरी हा एकटाच लहान होता. त्यामुळे त्याचे खूप लाड होत होते. त्याच्या बोलण्याचं, खेळण्याचं, गाणी म्हणण्याचं खूप कौतुक केलं जात होतं. त्याचा मामा त्याला कधी कधी आपल्या मोटरीतून बाहेर फिरायला किंवा तो कांही थोडचा वेळाच्या कामाकरता बाहेर जायचा असला तर आपल्या बरोबर नेत असे. एक दिवस गंमतच झाली. त्याने पपाला त्याच्या एका मित्राकडे नेले. पपा आतमधे एका मुलाशी खेळत होता आणि मामाच्या लक्षातच राहयलं नाही की आपण ह्या मुलाला आपल्या बरोबर आणलं होतं. घरी आल्यावर जेव्हा त्याच्या आईने चौकशी केली तेव्हा मामाच्या एकदम लक्षात आलं आणि तो ताबडतोब पुन्हा मोटर घेऊन त्याला आणायला गेला.

इकडे मामा आपल्याला बरोबर न घेतांच घरी गेला हे जेव्हा पापाला कळलं तेव्हा त्याला रडू यायला लागलं आणि त्याला मामाचा रागही आला. असा कसा तो आपल्याला इथे विसरला? तो कुणाशीही न बोलता तरातरा मागच्या व्हरांडचात गेला आणि पोटाशी पाय घेवून खाली मान घालून जमिनीवर निजून राहिला. त्याला बहुधा खूप रडू येत होतं पण सर्वासमोर रडणं प्रशस्त वाटत नव्हतं. राग आला की ही त्याची नेहमीची स्टाईल होती. तशा पोझीशन मधल्या पपाला पाहून सगळ्याना गंमतच वाटली. एवढ्यात तेथे मामा येऊन पोचला. मामाने पपाला कडेवर उचलून घेतलं आणि त्याला तिथे विसरल्याबद्दल त्याच्याजवळ खूप वेळा sorry ! sorry क म्हटलं म्हणजे त्याने म्हणायलाच लावलं. Sorry म्हण, Sorry म्हण! त्याने तसं म्हणताच त्याचा राग थोडा शांत झाला. मामाने त्याला- शिवाय बराचसा खाऊ आणि खेळायला पत्ते आणून दिले तेव्हा तर त्याचा मामावरचा राग नाहीसा झाला आणि पत्ते आणून दिल्याबद्दल तो त्याच्याकडे पाहून गोडसा

हसला आणि Thank you म्हणाला. त्याला please, Thank you, sorry असले शब्द म्हणायला खूप आवडायचं आणि तो त्याचा योग्य वेळी उपयोगही करू शकत होता.

लग्नाकरता घरासमोरच्या अंगणात सुरेखसा मांडव घातला होता मामाबरोबर तो घरी आला तर सगळेजण मांडवात जेवायला बसले होते. मामाने त्यालाही एका पाटावर आपल्याजवळ जेवायला बसविले. असे मांडवात पाटावर जेवायला बसायची त्यांची पहिलीच वेळ होती. त्याला तिथे मजा वाटत होती. जेवणात त्याच्या आवडीची जिलबी पाहुन तो खूष झाला होता. त्याची आई पंगतीमधे जिलबी वाढत होती. त्याने एकदम आईला मोठ्याने हाक मारली आईला वाटलं की त्याला जिलबी हवी आहे. पण तो म्हणाला 'आई, तुला मांडवाला इंग्लिशमध्ये काय म्हणतात माहीत आहे?'

'नाही बुवा, काय म्हणतात?' आईने विचारले!

'मॅंडव ! मांडवाला मॅंडव म्हणतात. आणि पाण्याला काय म्हणतात?

'वॉटर'

'वॉटर? हट् वॉटर नाही काही. वॉटर कसलं वॉटर? पाण्याला पॅणी म्हणतात पॅणी!' त्याने मोठ्या ऐटीत सांगितले सगळ्यांना त्याचं मॅंडव आणि पॅणी ऐकून गंमत वाटली आणि ते हसायला लागले. त्याला वाटलं आपलं कौतुक होतंय मग तो मामाला म्हणाला 'मामा, तुला बदक ह्या शब्दाचं स्पेलींग माहीत आहे?'

त्याने नाही म्हणताच हा पटकन म्हणाला 'B.D.K. ब-द-क!'

'हे कुठे तू तूझ्या बालक मंदिरात शिकलास का?' मामाने विचारलं त्यावर तो म्हणाला 'नाही काही, हे मी मनाने तयार केलंय'

त्याचं मनाने तयार केलेलं, नामांकित इंग्लीशचं ज्ञान सर्वासमोर आणखी प्रगट होऊ नये म्हणून त्याच्या आईने त्याला म्हटलं 'अहो पॅणी महाराज आता बडबड बंद करा आणि पानातलं लवकर लवकर संपवा. पानात काही टाकायचं नाही बरं का!'

❋

# पपाचा पहिलम् प्यारा

'अरे तुला किती वेळा सांगितलं अंघोळीला जा म्हणून! तू जात का नाहीस? बादलीतलं पाणी गार सुद्धा झालं असेल. 'आई आता तूंच आधी अंघोळ कर मी नंतर करीन मला नाही किडा व्हायचं?

'अरे कसला किडा आणि कसला विडा रे!'

'हो दोघांची अंघोळ झाली आहे. तिसऱ्याची अंघोळ म्हणजे तो कातीण कीडा होतो. मला तिसरा नंबर नको. मी चवथा सोन्याचा विडा होईन. मला पहिल्यांदा का करू नाही दिली अंघोळ? आता मी तुझ्यानंतरच करणार!'

खरं म्हणजे पपाला पहिलम् प्याराच व्हायला आवडायचं. तेवढ्याकरता जेवतांना सुद्धा तो लवकर उठायचा किंवा उशीरा उठला तरी आपली ताट वाटी उचलून पहिलम् प्यारा असं म्हणत ती भांडी मोलकरणीला घासायला तो नेऊन देत असे. तो आणि त्याची भांवडं आणि मित्र वगैरे एकत्र जमली की खेळतांना त्यांची असलीच गाणी चालत. एक दोन, तीन, चार असं म्हणण्याऐवजी ते नेहमी पहिलंम् प्यारा, दूध मोगरा, कातीण कीडा, सोन्याचा विडा, पाचवा चांद, सहावा मांग, असलं काही तरी म्हणत असत.

खेळतांना राज्य कुणावर हे ठरविण्याकरता तिघांनी मिळून ते चकत असत. हात उलटे आणि सुलटे ह्यावरून एकेक जण त्या चकण्यातून बाजूला होई शेवटी उरलेल्यावर राज्य येई पण यामधे आपल्यावर राज्य यायला नको म्हणून चकण्यामधे आपला पहिलं प्यारा किंवा दूध मोगरा असा नंबर लावण्याकरता त्यांची धडपड चालंयची. त्यावरून भांडणही होत. नंतर त्यांना कुणीतरी सांगितलं की चकणे हा प्रकार मुलींचा आहे. म्हणून ते मग चकण्याऐवजी इरींग, मीरींग, लवंगा तीरींग ह्या गाण्याचा उपयोग करीत असत. सर्व मुलं गोलांत उभे रहात असत आणि एखादा धिटुकला मुलगा प्रत्येकाच्या खांद्याला हात लावीत म्हणत असे इंरीग मीरींग लवंगा तीरींग.

*लवंगा तीरचा डुब डुब बाजा*

*गायी गोपी उतरला राजा*

असा एकेक राजा उतरायचा आणि शेवटी रहाणाऱ्यावर राज्य यायचं पण ह्यामधे सुद्धा इरींगची सुरूवात कुणापासून करायची ह्यावर वाद सुरू होई. कारण ज्याच्यापासून सुरूवात त्यानंतरच्या बाराव्या नंबरचा राजा उतरतो हे गणित हळूहळू मुलांना कळायला लागलं होतं. मग कोणी तरी मधेच 'डुबडुब' हे दोन वेगवेगळे शब्द म्हणून मोजायचा आणि बाराव्या ऐवजी तेरावा राजा उतरायचा



पान फुंकणीच्या खेळामधे एक पान ठेवून त्यावर मातीचा छोटासा ढीग करायचा आणि त्यावर प्रत्येकाने हळू, जोराने, मधे, बाजुला पाहिजे तशी फुंकर मारायची ज्याच्या फुंकरीने ते पान दिसेल त्याच्यावर राज्य अन् मग शिवाशिवी किंवा लपंडावाचा खेळ सुरू होई, ही फुंकर मारतांना पपाचा पाहिलं प्यारा कसं होता येईल ह्याबद्दल त्याचा कटाक्ष असायचा पाहिली फुंकर तो बरीच जोरात मारीत असे. तो किती जोराने मारायची ह्याचे तंत्र मुलांची संख्या लक्षात घेऊन तो बरोबर जमीनत असे. पुढच्या दोन तीन मुलांमधेच बहुतेक पान दिसत असे आणि त्याला पुन्हा फुंकर मारावी

लागत नसे.

'आई, माझं नाव तू 'अ' पासून सुरू होईल असं कां नाही ग ठेवलस' एक दिवस त्याने आपल्या आईला विचारलं.

'का रे, अ मधे एवढं काय विशेष आहे'

'विशेष म्हणजे शाळेच्या रोलवर सुद्धा माझं पहिलं नाव आलं असतं. पहिलं नाव येईल असंच तू ठेवायला हवं होतंस माझं नाव'

अरे तुझं नाव ठेवलं तेव्हा, बारशाला मला तुझी ही आवड कुठे माहीत होती. तसं पहिलं नाव नाही तर वर्गात पहिला नंबर मिळवून तुझा पहिलम् प्यारा होऊ दे की।'

आणि त्याप्रमाणे त्याने खरोखरीच पहिलं प्यारा नंबर मिळविला होता.

# पपा रस्त्यात हरवतो

एकदा पपा आपल्या आईबाबा बरोबर अकोल्याला आपल्या एका काकां कडे गेला होता. तेव्हा तो २ १/२- ३ वर्षाचा असेल. उन्हाळ्याचे दिवस होते. रात्री बाहेर अंगणात पलंगावर निजल्या निजल्या गप्पा करतांना दुसरे दिवश सिनेमाला जायचं ठरलं सिनेमा हाणामारीचा, सस्पेन्स असलेला सर्वांना आवडेल असा होता, म्हणजे वर्तमान पत्रातील जाहिरातीत तरी असं लिहिलं होतं. काकांच्या एका मित्रानेही त्या सिनेमाची तारीफ केली होती मग सिनेमाला कुणी कुणी जायचं कसं जायच, घरातून केव्हा निघायचं वगैरे त्यांनी ठरविलं.

ठरविल्याप्रमाणे ठरलेल्या वेळेवर त्यांनी दोन सायकल रिक्षा केल्या. तेव्हा ह्याच सायकल रिक्षाच प्रचलित होत्या. एका रिक्षात पपाचे बाबा व काका बसले. दुसऱ्या रिक्षात स्वतः पपा, त्याची आई व काकु बसले. सिनेमा थिएटर घरापासून बरेच दूर होते पण गप्पा करतांना त्यांचे अंतर जाणवलं नाही. संध्याकाळची वेळ होती. रस्त्याने गर्दी बरीच होती. गर्दीमधे

दोन रिक्षे मागे पुढे झाले. पपाचा रिक्षा आधी पोचला. तिघेही रिक्षातून खाली उतरले. व दुसऱ्या रिक्षाची वाट पहात तिथेच उभे राहिले.

पपाची आई आणि काकु आपसात गोष्टी करण्यात दंग होत्या. आणि पपा तिथेच खाली वाकून रिक्षाच्या चांकांचं निरीक्षण करीत होता. नुकताच आधीचा सिनेमा संपला आणि तेथे प्रचंड गर्दी झाली होती. थोड्याच वेळात पपाच्या आईला त्याच्या बाबांचा आणि काकांचा रिक्षा येतांना दिसला पण पपा रिक्षा जवळ उभा होता. तो दिसे ना गर्दीमधे तिने इकडे तिकडे पाहिले पण तिला तो दिसेना. तिने काकुला सांगितले. काकुने मोठ्याने हाक मारली पण तो तिथे आला नाही. दोघींनाही घाबरल्यासारखे झाले. दुसरा रिक्षा तिथे पोचताच त्यांना पपाच्या आईने तो तिथे दिसत नसल्याचे सांगितले त्यावर काका त्या दोघांनी रागावून म्हणाले. 'असं कसं तुमचं त्याच्याकडे लक्ष नव्हतं. तुम्ही असाल आपल्याच गप्पामधे दंग. आता एवढ्या गर्दीत त्याला कसं शोधायचं. बिचारं पोर गर्दीत घाबरून गेलं असेल. आता तुम्ही दोघी ह्या दिशेने शोधा आणि आम्ही दोघं त्या दोन बाजुंनी शोधतो. घाबरू नका, फार वेळ झाला नाही. इथेच कुठेतरी सापडेल.

घाबरू नका म्हटलं तरी तो सापडेपर्यंत सर्वांनाच मनातून घाबरायला झालं होतं. नाही नाही ते विचार मनांत येत होते. त्याला कुणी पळवून तर नेलं नसेल ना इथपर्यंत पपाच्या आईच्या विचाराची मजल गेली. तो सापडेपर्यंतचा पाचच मिनिटांचा काळ त्यांना केवढा तरी मोठा वाटला. आणि काळजीत गेला. एक माणूस रडत असलेल्या पपाला घेऊन येतांना दिसला आणि सर्वांना हायसं झालं.

थिएटरच्या आवारात मोठाले पोस्टर्स लावले होते. ते पहाताना हा एकटाच मुलगा त्या माणसाला तिथे दिसला. त्याने त्या नाव वगैरे विचारलं जवळ आई आणि काकु नव्हत्या आणि ह्या अनोळखी माणसाला पाहून त्याला रडायला आले. त्याने पपाला त्यांचं नाव, पत्ता, बरोबर कोण आहे वगैरे विचारून पाहयलं पण तो फक्त आई आई म्हणून रडत होता. एरव्ही नाव विचारलं तर तो आपलं पूर्ण नाव, पत्ता सविस्तर सांगायचा पण त्यावेळी घाबरल्यामुळे तो काही सांगू शकला नाही. शेवटी त्या माणसाने

त्याला आई शोधून काढू असं म्हणून बाहेर आणलं आणि एवढ्यात त्यांची भेट झाली. आईला पहाताच त्याने एकदम धावत येऊन रडत रडत आईला घट्ट पकडून ठेवले. तेवढ्यात पपाचे बाबा आणि काकाही तिथे येऊन पोचले.

रिक्षाचं चाक पहाता पहाता तो चुकून आतमधे पोस्टरजवळ गेला होता. समोर जाणाऱ्या दोन बायका त्याला गर्दीत दुरून आई आणि काकु सारख्या वाटल्या होत्या आणि त्यांच्या पाठोपाठ तो आतमध्ये जाताना वाटेत गमतीदार पोस्टर दिसलं ते पहात तो उभा होता असा नंतर उलगडा झाला. पण घडलेल्या प्रसंगाने सगळ्यांनाच घाबरल्यासारखे झाले. त्या माणसाचे आभार मानून सगळेजण आतमधे सिनेमा पहायला जाऊन बसले. पण कितीतरी वेळ तो आईच्या मांडीवर बसून आतल्या आत हुंदके देत होता. थोड्या वेळाने तो शांत झाला.

सिनेमात मारामारी चालू होती. सिनेमातल्या हिरोच्या कपाळावर त्याचा शत्रु जोरात काठी मारतो अन् रक्तं येतं असं दृश्य होतं. ते रक्त पाहून पपाला पुन्हा रडायला आलं. त्या हिरोची आई कुठे गेली आहे? ती त्याचं रक्तं पुसून त्याला औषध पण लावीत नाहीये? आणि त्यावर पट्टी का बांधीत नाहीये? असे त्याचे प्रश्नावर प्रश्न विचारणं चालू होतं, हे विचारतांना त्याचा सूर काळजी आणि दु:खाचा होता.

घरी सुद्धा खेळतांना तो कुठे पडला आणि थोडसं कुठे खरचटलं की तो आधी आयोडेक्स, आयोडेक्स करीतच आईकडे यायचा. आईने जखमेवर आयोडेक्स, तेल किंवा दुसरं एखादं औषध लावायचं आणि मुख्य म्हणजे त्यावर पट्टी बांधायची म्हणजे त्याचा बाऊ ठीक होत असे. त्याचं दुखणं बरं होत असे. पण हे त्याचं हरवल्याचं त्याला आणि त्याच्या आईबाबाना झालेलं दु:ख बरं व्हायला मात्र पुष्कळ दिवस लागले होते. ठरल्याप्रमाणे सगळ्यानी तिथे बसून तो सिनेमा पाहिला पण त्याचा आनंद कुणालाच मनापासून उपभोगता आला नाही.

# पपा आठ आणे वाचवतो

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

बालक मंदिरातून घरी आल्यावर थोड्या वेळाने पपाला त्याची आई बगीच्यात खेळायला नेत असे. तिथे आजुबाजुची बरीच मुलं येत असत. त्यांच्याबरोबर चेंडू खेळायला आणि सी-सॉ, झोपा घसरगुंडीवर खेळायला त्याला खूप आवडत असे. कधी कधी त्याचे बाबा त्यांच्या बरोबर येत असत. बगीचा घरापासून अगदी जवळ नव्हता. त्यामुळे जातांना पपाचा उत्साह असला तरी तिथे खेळल्यानंतर परत येतांना पायी चालत यायला त्याला कंटाळा यायचा मग ते बरेच वेळा रिक्षाने परत घरी यायचे.

एकदा त्याच्याकडे त्याचे दोन आतेभाऊ बनारसहून काही दिवसाकरता रहायला आले कारण त्यांचे आईवडील अमेरिकेत गेले होते. अमेरिकेतून त्याच्याकडे तिथल्या छान-छान वर्णनाची पत्र येत शिवाय ते त्या मुलांकरता सुंदर खेळणी कपडे वगैरे आणणार होते. पपाला वाटलं की आपण सर्वांनीच अमेरिकेत जायला हवं. खूप मज्जा येईल. नेहमी प्रमाणे एक दिवस ते बागीच्यात फिरायला गेले. तिथे खूप फुलं फुलली होती. मधून मधून गालीच्या सारखे दाट हिरवळ होती. तिथं बसले असतांना त्याने आईला विचारलं आई, आपण का नाही ग अमेरिकेला जायचं? त्यावर आई म्हणाली होती.

'अरे अमेरिकेला जाणं म्हणजे अकोल्याला जाणं आहे का? इतकं सोपं आहे का तिथे जाणं? तिथे जायला खूप पैसे लागतात.'

'मग बँकेतून तुम्ही खूप पैसे आणा ना. तिथे तर खूप पैसे मिळतात'

'अरे ते पैसे कुणालाही मिळत नाही काही. आपल्याला ते आधी तिथे ठेवावे लागतात म्हणजे मग त्यातून आपल्याला पैसे मिळतात. तिथे ठेवायला आपल्याजवळ कुठे आहेत अमेरिकेला जाण्याएवढे पैसे?' आईने विचारले.

त्यावर तो काही बोलला नाही पण त्याच्या मनात काहीतरी विचार चालू असावेत. थोडा वेळ बगीच्यात बसणं झालं आणि ते घरी यायला निघाले घरी येताना रिक्षा कुठे दिसतोय का ते त्याची आई पाहू लागली. तेवढ्यात पपा त्याचा आईला म्हणाला.

'आई आज रिक्षा नको. आपण पायी पायी घरी चालत जाऊ.'

नेहमी रिक्षाकरता आग्रह धरणारा हा मुलगा पायीच चालत जाण्याचा आग्रह का करतोय हे आईच्या लक्षात आलं नाही. तिला थोडंसं आश्चर्यच वाटलं ती सहजच एकदम म्हणाली 'का रे आज रिक्षा का नको?'



'म्हणजे आपले आठ आणे वाचतील'

तेव्हा एक आणा, आठ आणे अशी, नाणी प्रचलीत होती. आठ आणे म्हणजे सध्याचे ५० पैसे.

'आठ आणे कशाकरता वाचवायचे? तुम्ही मुलं आता दमला असाल ना?'

'हो, तरी पण आपण ते वाचवू. आपल्याला ते अमेरिकेत जायला उपयोगी पडतील' पपा म्हणाला . पपाचं बोलणं ऐकून आईला मनापासून हसू आलं ती म्हणाली 'अरे एवढेसे आठ आणे वाचवून काय होणार? पण तू जेव्हा अमेरिकेला जाशील ना तेव्हा तू हे आजचे वाचवलेले आठ आणे मी तुला जरूर देईन.'

# पपा आणि शंकरपाळे

पपाला शंकरपाळे आवडत असल्यामुळे त्याची आई त्याच्याकरता बरेच वेळा शंकरपाळे करून ठेवायची. ते करीत असतांना पपाची मधे मधे लुडबुड चालायची. कातव्याने ते कापायला त्याला खूप गमत वाटत असे. पण कधी कधी ते कापतांना कातणं वाकडं जाई आणि शंकरपाळ्याचा आकार लहान मोठा किंवा वेडावाकडा होई मग आई त्याच्या हातातलं कातणं काढून स्वतः कापत असे.

एक दिवस पपा शेजारी मोहनकडे गेला. तेव्हा मोहनची आई- काकु- काही तरी लाटत होत्या. ते पाहून पपाने त्यांना विचारले.

'काकु, तुम्ही हे काय करता'?

'ओळख बरं काय करतेय'? पोळपाटावरची पोळी लाटता- लाटता त्यांनी पपाला विचारले.

'शंकरपाळे'

'माहिती तर आहे! मग कशाल विचारतोस?'

'मी तुम्हाला कापून देऊ का?'

'नको रे बाबा। वेडं वाकडं कापशील'

'मी आईला कापून देतो ना' पपाने त्यांना सांगितले पण त्यांनी त्याला मोहनबरोबर खेळायला बाहेर जायला म्हटले. तो बाहेर गेला नाही त्याचं प्रश्न विचारणं चालूच होतं.

'तुम्ही हे शंकरपाळे कुणाकरता केले'

'तुझ्या काकांकरता आणि मोहनकरता'

'आणि माझ्याकरता? मला शंकरपाळे खूप आवडतात' ते चौकोनी, छोटे छोटे गुलाबी रंगाचे खुसखुशीत शंकरपाळे पाहून पपाला ते खाण्याचा खूप मोह झाला काकुनी त्याला थोडेसे शंकरपाळे खायला दिले आणि सांगितले 'हे बघ, मी तुला आता शंकरपाळे खायला देतेय पण दुसरीकडे कुठे गेल की असं मांगू नये. चांगल नाही दिसत. कुणी दिल तर घ्याव'

काकूंनी दिलेले शंकरपाळे खावून तो आपल्या घरी गेला. घरी गेल्यावर

त्याने आईला शंकरपाळे करायला सांगितले. आईने दुसरे दिवशी करायचे कबुल केले.

त्या दिवशी दुपारी पपाच्या आईला शेजारी काकुंकडे जायचं होतं त्या तिकडे जायला निघताच पपा आईच्या पाठोपाठ निघाला. ते पहाताच आई त्याला म्हणाली 'तू रे कशाला माझ्या पाठोपाठ येतोस, तू घरीच काही तरी अभ्यास करीत बैस. तू जातोस तेव्हा मी येते का तुझ्या पाठोपाठ?'

आई गेल्यावर पपाने आपलं दप्तर घेऊन त्यातून पाटी पेन्सील काढली. तो गणित करीत बसला पण त्याचं लक्ष लागेना. मग त्याने एक पुस्तक दप्तरातून बाहेर काढलं. त्यामधे एक दोघांना दाढी मिशा काढल्या. एक दोघांच्या डोळ्यावर चष्मे चढवले ते पाहून त्याला मनाशीच खुदकन हसू आलं. मग त्याने दप्तर आवरलं आणि तो शेजारी मोहनकडे गेला.

नेहमीप्रमाणे मोहनशी न खेळता तो आतमधे आईजवळ जाऊन बसला काकु चहा करीत होत्या त्यांनी पपाला विचारलं.

'का रे तू घेशील का चहा?'

पपा आपल्या आईकडे पहायला लागला त्यावर त्या म्हणाल्या 'अरे आईकडे नको पाहूस. तुला आवडतो ना चहा?'

'हो आवडतो ना आणि चहा बरोबर शंकरपाळे सुद्धा आवडतात पण मी ते तुम्हाला मागणार नाही असं मागितलेले चांगलं नाही ना दिसत पण तुम्ही दिले तर आवडीने खाईन'

पपाच्या आईला अगदी संकोचल्यासारखे झाले पण काकुंना एकदम हसायला आलं. आपलं काही तरी चुकलं हे पपाच्या लक्षात आलं तो लगेच म्हणाला

'काकु मी तुम्हाला शंकरपाळे मागत नाही बरं का पण तुम्ही विचारलं म्हणून सांगतोय'

आईला पपाचा खूप राग आला होता. दोघं घरी गेल्यावर पपाने आईच्या हातचा एक धपका खाल्ला पण आपली नक्की चूक काय झाली ते त्याला कळलंच नव्हतं. आईच्या ते लक्षात येताच आईने त्याला नीट पुन्हा समजावून सांगितलं आणि एक हलकासा धपका मारून विचारले

'काय कळलं का?'

आता कुठे पपाच्या लक्षात आपली चूक आली तो ताबडतोब म्हणाला हो हो कळलं'

❋

# पपा पतंग उडवतो

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

पपाला पतंग उडवायला खूप आवडत असे. त्याला पतंग छान उडवता येत असे. लहान मोठे, रंगी बेरंगी पतंग उडविण्यात त्याचा किती तरी वेळ जाई. त्याला कंचे म्हणजे काचाच्या गोळ्या खेळायलाही खूप आवडत असे. त्याचा नेम छान होता. एका डब्यात त्याने जिंकलेले कितीतरी कंचे ठेवले होते. शिवाय लाकडी भोवऱ्याला दोरी गुंडाळून तो सुरेख भोवरा फिरवी अन् त्याच्या बाबाने त्याला एक भोवऱ्याचं गाणं शिकाविलं होतं ते तो म्हणी.

*भोवरा कसा गरगरा फिरे*

*एक जागी तो क्षणही ना ठरे*

*फिरत फिरत तो नाद किती करी*

*चित्त त्यामुळे आपुले हरी*

असं गाणं म्हणत फिरत्या भोवऱ्याला दोरी गुंडाळून तो हवेत उंच उडवून वरच्यावर पटकन झेलत असे.

हळूहळू कंचे, भोवऱ्याचं त्याचं आकर्षण कमी झालं आणि त्याला पतंग उडवायला आवडू लागलं. उंच निळसर आकाशात त्याचा रंगीत पतंग स्थिर झाला की तो पहाण्यात त्याला खूप मजा वाटे. मग एखादा पतंग हळूच त्याच्या पतंगाजवळ येई किंवा त्याचा पतंग आकाशात उडणाऱ्या दुसऱ्या एखाद्या पतंगाजवळ जाई आणि काटाकाटी सुरू होई. संक्रांतीला दोन तीन पतंग तरी तो नक्कीच काटून आणीत असे. सोबत पुष्कळसा मांजा आणि दोरा! सर्व मांजा त्याला मांजा म्हणून आवडत नसे कारण तो तितका पक्का असेच असं नाही, तो त्याचा दोऱ्यासारखा उपयोग करी

आणि धाकट्या भावाला व एक दोन मित्रांना घेऊन स्वतः घरी मांजा तयार करी त्याकरता काच कुटून त्याची बारीक पूड तो करीत असे.

एक दिवस त्याने आपल्या आईबाबांचे लक्ष चुकवून चूपचाप घरातला काचेचा एक ग्लास काचेची पूड करण्याकरता आणला. तो बारीक कुटला



पण कुटत असतांना काचेचा एक तुकडा त्याच्या हाताला लागला. हातातून रक्त यायला लागलं रक्त पाहून त्याचा लहान भाऊ घाबरला. तो आईला हाक मारू लागला. पण त्याने हात पाण्याच्या धारेखाली धरला आणि आईला हाक मारू नको म्हणाला. आई तिथे आली असती तर नक्कीच त्याला रागावली असती आणि ती कुटलेली काचही त्याला दिली नसती आणि झालं तसंच मुलांचा आरडा ओरडा ऐकून आई तिथे आली. तिनं पाह्यलं तर पपाच्या हातातून रक्त येत होतं. तिने चटकन घरातून हळद आणली आणि त्याच्या जखमेवर दाबली. रक्त बाहेर यायचं थांबताच त्यावर कापूस ठेवून पटटी बांधता बांधता मात्र ती त्याला रागावयला लागली. पट्टी बांधल्यावर तिने ती अर्धवट कुटलेला काच घरात नेली. पपाला लागल्याचे किंवा आई रागवल्याचे दुःख झालं नाही एवढे ती काच न मिळाल्याचं दुःख झालं.

मोठ्या माणसाचं लक्ष चुकवून ही मुलं मांजा करीतच असत. त्याकरता जेवणातला भात चूपचाप कागदामधे लपवून ठेवीत असत. पतंगाच्या काडया

छिलायची त्याची एक खास सुरी होती. पतंगाच्या एन मोसमात पतंग चिकटवायला एका छोट्या पातेल्यामधे नेहमी खळ केलेली असे. फाटेलेले पतंग चिकटवून तो पुन्हा उडवीत असे. कधी बाजारातून तो तयार पतंग आणी तर पुष्कळ वेळा तो स्वतः घरी पतंग तयार करी. पतंग किंवा मांजा तयार करतांना आपल्या धाकट्या भावाला हाताखाली तो खूप नाचवायचा पाणी आण, खळ आण, पतंगाला शेपटी लावायला एक पट्टी कापून दे, चक्रीवर दोरा गुंडाळून ठेव, वगैरे वगैरे! पतंग उडवतांना सुद्धा 'तू पतंगाला छुडैया दे नंतर चक्री पकडून ठेव, मधेच ढील दे, तर मधेच नीट दोरा पकडून ठेव असा सूचनावजा आदेश तो देत असे आणि तोही बरेच वेळा आपल्या दादाचे ऐकत असे.

एकदा पपाचा छोटा पतंग त्याच्या शेजाऱ्याने मोठ्या ढढ्या पतंगाने काटला. पतंगाबरोबर त्याचा खूपसा मांजाही गेला. त्याला खूप वाईट वाटलं. आपला अपमान झाला असं ही वाटलं कारण त्या मोहल्ल्यात पतंग उडविण्यात तो पटाईत समजला जात असे. शेजाऱ्याने आपल्यावर अन्याय केला असं त्याचं मत होतं. त्याची बडबड चालू होती की मोठ्या पतंगाने छोटा पतंग काटण्यात काय शूरपणा? असले हिंमत तर बरोबरीच्या आकाराचा पतंग उडव आणि काट म्हणावं माझा पतंग?

त्याने मग एक ढड्डा पतंग केला. घरीच तयार केला. चांगल्यापैकी मांजा तयार करून ठेवला. जेव्हा शेजाऱ्याचा ढड्डा पतंग आकाशात उंच उडू लागला तेव्हा त्यानेही आपल्या ढड्डा पतंग बाहेर काढला आणि भावाच्या मदतीने उंच उडवला. दोघांचे मोठाले पतंग आकाशात जवळ येत होते. त्यांचे दोरे एकमेकात गुंतत होते आणि ते शिताफीने मोकळे केले जात होते. कितीतरी वेळ असे पतंग उडवून एकमेकांचे पतंग काटण्याचा त्यांचा प्रयत्न चालू होता. दोघांमधे चुरस निर्माण झाली होती. संधी मिळताच पपाने एकदम दोरा जोरात ओढला आणि शेजाऱ्याचा पतंग काटला. इतकंच नाही तर तो हळूहळू गिरक्या घेत घेत खाली आला तेव्हा तो आणि त्याच्याबरोबर असलेल्या थोडासा मांजा त्याने मिळविला त्याला. खूप आनंद झाला.

# पपा पोहायला जातो

पपाच्या घराजवळच्या शाळेत पोहण्याचं एक टाकं होतं. तिथे बरीच मुलं पोहायला जात असत. पोहणं शिकवायला तिथे मास्तरही येत. पपाला आणि त्याच्या भावाला पोहणं शिकवावं असं त्यांच्या आईबाबांना वाटत होतं. पपाला प्रथम पोहण्याची, पाण्यात जाण्याच्या कल्पनेची सुद्धा भीती वाटत होती. तो काहीतरी कारणं सांगून तिथे जायची टाळाटाळ करीत होता. शेवटी एक दिवस पपाच्या बाबांनी त्याला आणि त्याच्या भावाला पोहण्याच्या टाकीवर नेलं आणि मास्तरांना त्या दोघांना पोहणं शिकाविण्याविषयी सांगितलं. त्यांनी त्यांची वर्गणी दिली आणि मुलांनी रोज सकाळी पोहायला जायचंच म्हणून सांगितलं.

मास्तरांनी पपाला प्रथम उथळ पाण्यात जायला सांगितलं आणि टाकीची पाळ पकडून पालथं पडून पाय मारायला सांगितलं पाय मारतांना उडणाऱ्या पाण्याची त्यांना गमत वाटली. थोडं फार पाणी नाकांतोंडात गेलं पण पोहणं शिकायचं म्हणजे हे होणारच ह्याची त्यांना कल्पना होती. नंतर मास्तरांनी पपाला एकदम पाण्यात डुबकी दिली त्यावेळी मात्र त्याला घाबरल्यासरखे झाले.

दोन दिवसांनी मास्तर त्याला म्हणाले 'हं, ह्या पाळीवरून पाण्यात मार उडी! शिडीच्या पायऱ्यावरून खाली उतरायचं नाही. इथे उभा रहा आणि मार उडी!'

पपाची उडी मारायची हिम्मत होईना सगळे जण त्याला भित्री भागुबाई म्हणून चिडवायला लागले. शेवटी त्याने मास्तरांना पाण्यात जवळ उभं रहायला सांगितले आणि त्याने मोठी हिम्मत करून पाण्यात उडी मारली. त्याच्या नाकातोंडात पाणी गेलं. तो खूप घाबरला, ओरडला. त्या दिवशी काठाजवळच्याच पाण्यात पाय मारीत बसलां. मास्तरांनी त्याला पुढे जायला सांगितलं पण तो गेला नाही.

दुसरे दिवशी पाय दुखण्याचं निमित्त करून तो पोहायलाच गेला

नाही. तिसरे दिवशी सकाळी पाया ऐवजी पोट दुखायला लागलं त्याचं! तो पोहायला जात नाही असं म्हणाला. त्याच्या बाबांच्या लक्षात आलं की तो पोहायची टाळाटाळ करतोय. ते त्याला स्वतः पोहायला घेऊन गेले. तेव्हा त्यांना सगळी परिस्थिती समजली. त्यांनी पपाला समजवून सांगितल. ते म्हणाले 'अरे, पोहायला शिकतांना असं नाकातोंडात थोडं पाणी जातंच. काही जण घाबरतात, त्यांना मग मुलं चिडवतात पण दोन चार दिवसांत हे घाबरणं वगैरे कमी होईल, आणखी दोन चार दिवसांनी तुला छान पोहायला येईल आणि पोहण्याची गंमत वाटेल आणखी दोन चार दिवसांनी तू इतर घाबरणाऱ्या मुलांना कदाचित असंच चिडवशील. तेव्हा धीटपणाने माझ्यासमोर उडी मारून दाखव बर!'

पपाने उडी मारून दाखविली. त्याची हळूहळू पाण्याची भीती कमी झाली आणि त्याला पोहण्याची गंमत वाटू लागली. पोहायला जायचं हा त्यांचा आवडीचा कार्यक्रम झाला. सकाळी साखरझोपेतून लवकर उठायचा पपाला एखादे दिवशी कंटाळा यायचा. विशेषतः रात्री अंगणात निळ्या आकाशाच्या छताखाली चांदण्या चमचमत असतांना खूप उशिरापर्यंत निजल्या निजल्या सगळ्यांच्या गप्पा रंगात यायच्या आणि झोपायला उशीर व्हायचा तेव्हा! त्यावेळी रात्री घरामधे कूलर लावून झोपण्याची पद्धत नव्हती घरोघरी कूलरचा उपयोगच करण्यात येत नव्हता. त्यामुळे बाहेर निजण्याची मजा काही न्यारीच होती. पहाट झालेली कळायची ती कोकिळेच्या कुहुकुहु ने आणि चिमण्यांच्या चिवचिवाटाने! झाडांवर बसून त्या चिमण्यांचा खूप कल्ला चाले. पोहायला सुटी असली आणि सकाळी जरा उशीरापर्यंत झोपायचा मुलांनी बेत केला तरी चिमण्यांच्या कलकलाटामुळे ते झोपू शकत नसत. पपा डोक्यावरून पांघरूण घेऊन बडबडायचा- 'काय ह्या चिमण्या, स्वतःही झोपत नाहीत आणि आम्हालाही एखादे दिवशी उशीरापर्यंत झोपू देत नाही.'

पपा पुन्हा झोपायचा प्रयत्न करीत असे पण तो यशस्वी होत नसे. शेवटी तो आपल्या भावाला उठवी. तोही जागा झालेलाच असे.

पोहल्यामुळे त्यांना खूप व्यायाम होत असे. ते पोहतांना वेगवेगळ्या

स्ट्रोकसचा उपयोग करीत. आपापसात त्यांच्या शर्यती लागत. त्यामुळे त्यांना खूप मेहनत व्हायची आणि दणकून भूक लागायची. पपाचा एक मित्र शेतीवाला होता. शेजारीच रहायचा. त्याच्याकडून किंवा कधी कधी बाजारातून आंबे आणून आंब्याचा रस काढला जाई. त्यावेळी रसाचे आंबे खूप मिळत असत आणि आंब्याच्या मोसमात जवळ-जवळ रोजच पपाकडे रस करीत. तेव्हा आंबे कापून खाण्याची फारशी पद्धत नव्हती. रस काढण्याचं काम पपा आणि त्याच्या भावाचं होतं. आंबे धुणं, ते माचवणं आणि मग रस काढणं. रस काढल्यावर २-४ कोयीचा रस न काढता उलट त्या रसात बुडवून ते दोघंजण त्या चोखीत असत जणू काही रस काढण्याबद्दलचा तो त्यांचा हक्कच होता. रसामुळे आणि पोहण्याच्या व्यायामामुळे त्यांची जेवणं मनापासून भक्कम व्हायची.

उन्हाळ्याची सुटी संपून शाळा सुरू झाली की पपाचं पोहणं बंद होई. पुन्हा दुसऱ्या वर्षी उन्हाळ्याच्या सुटीमधे पोहायला मिळणार म्हणून तो त्या सुटीची आतुरतेने वाट पहात असे.

## पपाचे अभ्यासेतर कार्यक्रम

पपाला वाचनाचा फार नाद होता. वेगवेगळ्या निमित्ताने त्यांनी बरीच पुस्तके घेतली होती. तो लहानपणापासूनच त्यांच्या घरी असलेली बुक ऑफ नॉलेज, एनसायक्लोपीडीआ अशी पुस्तकं सुद्धा आवडीने वाचीत असे त्याला लवकर चष्मा लावावा लागल्याचं एक कारण म्हणजे वयाच्या मानाने त्याचं खूप वाचन आणि तेही बरेच वेळा अर्धवट प्रकाशात! आपल्याजवळची पुस्तकं मित्रांनी वाचावी व त्यांच्याजवळ काही पुस्तकं असली तर ती आपल्यालाही वाचायला मिळावीत म्हणून त्याने लायब्ररी काढायची कल्पना एकदा मांडली. सर्वांना ती पटली पण ती पुस्तके कुणाकडे ठेवायची त्यावर बरीच चर्चा झाली. वर्गणी घ्यायची का आणि घ्यायची असल्यास किती. त्याचा हिशोब, कुणी व कसा ठेवायचा ह्यावर विचार केला. शेवटी ती पुस्तकं पपाकडेच एका

कपाटात ठेवावी अस ठरलं. नाममात्र वर्गणी आकारायची आणि त्यांतून कव्हरकरता व हिशेबाकरता कागद वह्या आणायचे असे ठरले. मग मित्रांकडची सर्व पुस्तकं एकत्रित करून त्यांना कव्हर घालणं, त्यावर कॅलेण्डरचे नंबर कापून चिकटवणे, वाचतांना खूण म्हणून वापरायला एकेक गोफ चिकटवणे, वह्यामध्ये त्यांच्या याद्या करणं त्यामध्ये त्यांचा वेळ चांगला गेला.



एकमेकांच्या वाढदिवसाला भेट म्हणून पुस्तकंच द्यायची आणि पुस्तकं वाढवायची असं ठरलं. पुस्तकं जपून वापरण्यासंबंधीचे नियम एका खड्र्यावर लिहून ठेवाले व तो खर्डा भिंतीवर टांगून ठेवला. वाचलेल्या पुस्तकातलं काय आवडलं ह्याची नोंद करून एकमेकांना दाखवायची असं ठरलं. पुस्तक फाटलं तर ते चिकटवून द्यायचं असं ठरलं काही दिवस ही लायब्ररी बरी चालली. पण पुढे काही मुलं पुस्तकं वेळच्या वेळी परत करीनाशी झाली, परत केली तर फाटक्या अवस्थेत! काही पुस्तकं हरवली. त्यावरून त्यांच्यामध्ये भांडणं झाली. शेवटी मुलांनी उरलेली आपापली पुस्तकं परत घरी नेली.

एका सुटीमध्ये पपाने एक सिनेमा तयार केला होता. त्याकरता एक

लाकडी खोका घेऊन त्याला समोर एक गोल भोक करून त्यामधे एक भिंगं लावलं होतं. आतमध्ये विजेचा बल्ब लावण्याची व्यवस्था केली होती. आणि ज्या सिनेमाची फिल्म दाखवायची ती काडीला गुंडाळून ती त्या खोक्यात अशी बसवली होती की तिची दोन टोकं खोक्याच्या दोन बाजुला येतील. ती काडी मागे पुढे फिरवून ती फिल्म सोडता किंवा गुंडाळता यायची. भिंतीला पांढरी चादर लावून पडदा लावायचा. दारं खिडक्या बंद करून त्या अंधारात ती फिल्म पहाण्यात त्यांचा कितीतरी वेळ मजेत जाई. त्या फिल्मस् पहायला मुलांची बरीच गर्दी व्हायची. त्यांनी सिनेमाच्या खूपशा फिल्मस् गोळा केल्या होत्या. ते त्याच त्या आलटून पालटून पहात. नंतर मग त्यांनी वर्तमानपत्रांतल्या व मासिकांतल्या चित्रकथा कापून त्या एका पाठोपाठ एक कागदाच्या लांब पट्टीवर चिकटवून सिनेमा फिल्मस् तयार केल्या होत्या. पपा त्याची रनींग कॉमेन्ट्री करीत असे त्यामुळे त्या फिल्म पहायला त्यांना आणखी मजा वाटे. फिल्मस् ची अशी कितीतरी भेंडोळी त्यांच्या खोलीमध्ये नंतर खूप दिवस होती.

पपाच्या घराभोवती मोकळी जागा बरीच होती. त्यामुळे समोर फुलांचा बगीचा करावा, मागे भाज्या लावाव्या असं त्याच्या आईला वाटत होतं. तिने माळ्याला व मुलांना मदतीला घेऊन समोर मोसमी फुलांचे वाफे केले. बॉर्डर लावून घेतली पण त्याला पाणी घालणं, अधूमधून खत घालणं, वाफे स्वच्छ ठेवणे हे नियमितपणे आणि वरचेंवर करावे लागणारं काम। शिवाय परसदारी भाजीपाला लावायचा होता सुरूवातीला मुलांनी उत्साह दाखविला म्हणून भाज्याकरता वाफे केले. पपाने वेगवेगळ्या भाज्याच्या बिया आणून वाफ्यात लावल्या. लाल भोपळा, काकडी, तोंडली ह्यांचे वेल लावले त्यांचे आजोबा बगीचात बरंच काम करीत आणि नातवंडाना काम करायला सांगत पण पपाला बागकामाची फारशी आवड नव्हती. बगीचा फुलांनी फुललेला चांगला दिसतो हे जरी त्याचं मत असलं तरी त्याकरता मेहनत करायची त्याची तयारी नसे. आई आणि आजोबा सांगतात म्हणून अधूनमधून तो करायचा पण बरेच वेळा बागकामाच्या वेळी ते टाळण्याकरता कारणं शोधत रहायचा.

एक वर्ष लाल भोपळयाच्या वेलाला खूप भोपळं लागले. इतक्या

भोपळ्यांचे काय करायचं हा प्रश्न होता. शेजारी व नातलगांकडे घरचे भोपळे म्हणून कौतुकाने द्यायचे ठरविले. तर पपाचं म्हणणं 'आपलेच भोपळे द्यायचे आणि तेही आपणच! हे काही ठीक नाही. आपल्या घरी कुणी आलं तर ते द्यावेत.' काही ठिकाणी त्याने दिले पण तेही नाराजीनेच. भोपळ्याच्या वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्या, भोपळ्याचं रायतं, भोपळ्याचे घारगे सारखे सारखे खाऊन इतका कंटाळा आला की पुढे एक वर्षभर पपाने घरी वेल लावू दिला नाही की बाजारांतून भोपळा आणू दिला नाही. मुलांचा बागकामाचा अनुत्साह पाहून आईने, बगीच्यामधील झाडांची संख्या हळूहळू कमीच केली. आणि ज्या झाडांकरता फारशी मेहनत घ्यावी लागणार नाही अशी झाडं बगीच्यात ठेवली.

गणपती उत्सवाच्या वेळी तर मुलांच्या अंगात उत्साहाचे वारे भरलेले असे. घराजवळच्या परिसरात चार पाच सार्वजनिक गणपती बसवत असत आणि तेव्हा कार्यक्रमही बऱ्यापैकी होत. सुंदर नाटकं होती. शिवाय सिनेमा गीत स्पर्धा वगैरे जिथे असेल तिथे ही मुलं हटकून जात. परिसंवाद, भाषणं, वगैरे व्हायची ती त्यांच्या डोक्यावरून जायची. कार्यक्रमाला जातांना पपा आणि त्याचे मित्र पिशवी घेऊन जात. पिशवीत एखादी छोटी सतरंजी किंवा आसन असे. शिवाय स्वेटर शाल वगैरे असे. कार्यक्रम उघडयावर व्हायचे अंगणात कधी कधी ओलसर जागा असे. अशा ठिकाणी खाली आसन किंवा सतरंजीचीच घडी बरी वाटायची. थंडी वाजली तर शाल आणि चपला काढून ठेवायला ती पिशवी कामाला यायची म्हणजे चित्त खेटरात अशी त्यांची अवस्था नसे.

उन्हाळ्याच्या दिवसात शेजारच्या आंब्याच्या झाडाच्या कैऱ्या तोडायला पपाला आणि त्याच्या मित्रांना खूप आवडे. बाजारांतून कितीही कैऱ्या घरी आणलेल्या असल्या तरी झाडाच्या पाडलेल्या ह्या कैऱ्यांची चव काही वेगळीच लागायची. शेजारच्यांच्या बगीचात आणि घरांच्या व्हरांड्यातून सामसूम दिसली की मुलं एकत्र जमून हळूच दगडाने नेम धरून कैऱ्या पाडीत. घरातून आधीच तिखटामीठाच्या पुडया नेलेल्या असत. समोरच्या पोर्चमध्ये किंवा कारंजावर बसून तिखटमीठ लावलेल्या त्या कैऱ्या खातांना त्यांना खूपच आनंद होत असे. शेजारच्या काकु त्यांना त्याबद्दल कधी कधी

म्हणायच्या त्यावर मुलांचं उत्तर तयार असे, आम्ही जमिनीवरच्या कैऱ्या गोळा केल्या! काही प्रमाणात त्याचं उत्तर खरंही असे कारण त्यांनी झाडाच्या पाडलेल्या कैऱ्या आधी जमिनीवरच पडत असत. कधी सायकलवरून ट्रीप काढीत असत. त्या मुलांना पत्ते वगैरे खेळायला फारसं आवडले नाही.त्याऐवजी कॅरम, विटीदांडू, कंचे वगैरे खेळच त्यांना आवडत असत. पपाचे अभ्यासेतर उपक्रम, फारसे उपद्रवी नव्हते. करमणूक करणारे, समूहाने अनुभवता येणारे आणि निर्मितीचा आनंद देणारे असे त्याचे हे विविध उपक्रम होते.

❊

# पपाची रामटेक सहल

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

पपाच्या वर्गाची रामटेक सहल ठरली तेव्हा तो प्राथमिक शाळेत शिकत होता. ह्यापूर्वी तो दोन वेळा रामटेकला जाऊन आला होता. पण पुष्कळ दिवसापूर्वी आणि आईबाबांबरोबर! ह्या सहलीमधे बरोबरीच्या मुलांबरोबर जायला मिळणार म्हणून तो खूष झाला होता. रामटेकला जाऊन रामाचं दर्शन घेण्यापेक्षा तिथल्या माकडांची भेट घ्यायलाच ही मुलं जास्त उत्सुक होती कारण त्यांनी तिथल्या माकडांच्या खूपश्या खऱ्या आणि काहीशा अतिरंजित गोष्टी ऐकल्या होत्या.

नागपूरला सुद्धा पपाच्या आणि त्याच्या मित्रांच्या घरी माकडांची सेना एखाद्या वेळी उडया मारीत येत असे. अंगणात काही खायचे पदार्थ वाळत घातलेले असले तर ती ते फस्त करीत. जर झाडांवर पेरू सीताफळांसारखी फळं लागली असली तर ती त्यावर ताव मारीत. झाडांची कोवळी पानं, फुलं खाऊन ती उध्वस्त करीत पण रामटेकला माकडं गडावर जाताना त्यांचा रस्ता कसा अडवतात, प्रवाशांच्या हातातले फुटाणे कसे खातात, लांब लांब उड्या कशा मारतात हे त्यांना प्रत्यक्ष पहायचे होते. म्हणून त्यांच्या मनात भीतीयुक्त उत्सुकता होती.

पपाच्या आजीने पूर्वी रामटेकला बरीच वर्षे घालविली असल्यामुळे तिने त्याला स्वतःचे काही अनुभव सांगितले होते त्यातली एक गोष्ट त्याच्या पक्की लक्षात राहिली होती. एकदा आजी चुलीजवळ बसून पोळ्या करीत होती तेव्हा स्वयंपाक चुलीवरच करण्याची पद्धत होती. भिजविलेल्या कणकेची परत तिने पोळपाटाजवळ आपल्याकडे ओढली तर ती लगेच दुसऱ्या बाजुला ओढली गेली. तिने पुन्हा आपल्याकडे ओढली तर ती पुन्हा जोराने बाजुला ओढली गेली. परात कोण ओढतंय म्हणून तिने बाजुला पाहयलं तर एक मो ठ्ठ हुप्प्या स्वयंपाकघरात आजीसमोर येऊन परात ओढून त्यांतला कणकेचा गोळा शांतपणे खातोय. इतक्या जवळ माकडाला बसलेले पाहून आजीला क्षणभर घाबरल्यासारखे झालं. तिने लाटणं हातात घेऊन हड् हड् केलं. पण ते तिथून मुळीच हललं नाही. शेवटी प्रसंगावधान राखून तिने चटकन चुलीतलं जळतं लाकुड बाहेर काढून त्याच्यावर उगारलं तेव्हा ते पळून गेलं. ही गोष्ट त्याने ऐकली तेव्हा आपली आजी खूप धीट आहे असं त्याला वाटलं होतं. त्याने आपल्या आजीची ही गोष्ट रामटेकला जातांना बसमध्ये मुलांना रंगवून सांगितली होती आणि त्यांनाही त्याची आजी खूप धीट वाटली होती.

ठरल्याप्रमाणे मुलं बसने रामटेकला गेली. आपापल्या जेवणाच्या डब्याच्या पिशव्या घेऊन ती गडाच्या पायथ्याशी आली. हिवाळ्याचे दिवस होते. हवेत थोडासा गारवा होता. त्यामुळे मुलांनी स्वेटर, मफलर, बूट मोजे वगैरे घातले होते. डोंगर हिरवेगार आणि सुंदर दिसत होते. त्यावरच्या पायऱ्या पायऱ्यांचा मंदिराकडे जाणारा रस्ता उठून दिसत होता. गडावर सीताफळाची खूप झाडं होती. त्या झाडावर त्यांना खूप वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी दिसले होते आणि झाडांना उंचावर खूप सीताफळं लागली होती. मुलांनी आधीच बाजारातून काही सीताफळं घेतली होती. आणि ती खात खात ती गडाच्या पायऱ्या चढत होती. पुढे कोण आधी जातो म्हणून काहींची शर्यत लागली होती. वाटेत माकडांना द्यायला म्हणून काही जणांनी मुद्दाम फुटाणे घेतले होते. काही पायऱ्या चढून होताच त्यांच्या भेटीला एखाद दुसरं माकड येऊ लागलं. मुलांचं लगेच कोरस सुरू झालं.

### *माकडा माकडा हुप-*
### *तुझ्या शेंडीला शेरभर तूप*

मुलांनी आपलं सीताफळं खाणं संपवलं. उरलेली सीताफळं त्या माकडांनी घेऊ नये म्हणून ती पिशवीत लपविली आणि ती पायऱ्या चढू लागली. वरून भोवतालचा हिरवागार परिसर आणि मध्ये मध्ये तलावाचे चमकणारे पाणी सुंदर दिसत होतं. चढण्याच्या मेहनतीमुळे मुलांना उकडायला लागलं. काहींनी स्वेटर वगैरे काढून पिशवीत ठेवले.

एका माणसाने एक माकड त्याच्याजवळ येताच त्याला द्यायला हातामध्ये फुटाणे ठेवले आणि ते माकड तिथे जाऊन त्याच्या हातातले फुटाणे भरभर उचलून खाऊ लागले. मुलांना गमत वाटली पण त्याच्यासारखे हातातून प्रत्यक्ष फुटाणे देण्याची कुणाला हिंमत होईना. कारण तोपर्यंत बरीच माकडं गोळा झाली होती. एका माकडांनी तर चक्क पपाच्या वर्गशिक्षिकेच्या पायाजवळ जाऊन तिची साडी पकडून ठेवली. ती घाबरली. तिने आपल्या हाततली पिशवी दूर फेकून दिली. दुसऱ्या माकडाने पिशवीतले स्वेटर वगैरे सामान उसकटले. ते उसकटतांना पोळ्याचा डबा बाहेर पडला आणि उघडला गेला. त्याबरोबर त्यातील पोळ्या घेऊन ती माकडं पळून गेली. तेवढयात दुसरे एक वर्गशिक्षक एक काडी घेऊन तिथे आले. त्याच्या हातातली काडी पहाताच साडी पकडलेलं माकडही तिथून पळून गेलं. शिक्षकांनी मुलांना बजावलं की वाटेत कुणीही माकडांना फुटाणे द्यायचे नाही. फुटाण्यामुळे खूप माकडं गोळा होतील. तर त्यांना हाकलणं कठीण काम होईल. मुलांनी फुटाणे पिशवीत लपविले पण आपली पिशवी तर ही माकडं ओढणार नाही ना अशा शंकेमुळे भीतभीतच ती वरपर्यंत गेली. एकीकडे त्या माकडांबद्दल कुतूहल वाढत होते तर दुसरीकडे एक भीतीही वाटत होती.

काही माकडं एका झाडावरून दुसऱ्या झाडावर केवढया लांब लांब उडया मारीत होती. काही माकडीणीच्या पोटाशी तर त्यांची छोटी छोटी पिल्लं होती. तरी त्यांचं त्या पिल्लासकट उडया मारणं चालू होतं. झाडावर आणि पायऱ्यावर बसलेल्या माकडांच्या लोंबत असलेल्या लांब- लांब शेपट्या

गमतीदार दिसत होत्या त्या शेपटया पाहून एका मुलाला 'माकडाच्या खोडकर पिलाचं शेपूट सुताराने अर्धवट कापून ठेवलेल्या लाकडाच्या फटीत कसं अडकतं' या गोष्टीची आठवण झाली. तर दुसऱ्याला 'दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ' ह्या गोष्टीतील लोण्याकरता भांडणारे दोन बोके आणि तराजुने तोलून त्याची वाटणी करणारे चतुर माकड आठवले. एका मुलाला माकडांनी झाडाखाली बसलेल्या व्यापाऱ्याच्या टोप्या कशा पळवल्या या गोष्टीची आठवण झाली तर रामाला सेतु बांधण्याकरता मदत करणाऱ्या माकडांची आठवण करीत करीत ही मुलं गडावर पोचली.

गडावर मुलांनी प्रथम त्यांच्या आवडत्या मारूतीचं दर्शन घेतलं. मुलांना साधारणपणे देवांमध्ये मारूती आवडतो. नंतर त्यांनी लक्ष्मणाचं आणि नंतर रामसीतेचं दर्शन घेतलं. रामझरोक्यातून उंचावरून रामटेक गाव कसे दिसतं हे पहायला ही मुलं गटागटाने वर गेली. तिथे गटागटाने माकडं सुद्धा बसली होती. वर चढतांना पपाची पिशवी एका माकडाने पकडली. त्याला क्षणभर घाबरल्यासारखं झालं पण आपण ते बाहेर दाखविले तर मुलं आपल्याला भित्री भागुबाई चिडवतील असं वाटलं. त्याच्या पिशवीत खायचं काहीच सामान नव्हतं. दोघा-तिघांचे स्वेटर, मफलर वगैरे होते. त्याने भिऊन पिशवी फेकून वगैरे न देता वरून शांतपणाचा आव आणून त्या माकडाला पिशवी उघडून दाखवली आणि म्हटलं. अरे ह्या पिशवीत खायचं काही नाही. हे बघ आमचे फक्त स्वेटर्स आहेत.' त्याने पिशवीतले स्वेटर्स काढून दाखविले. त्या माकडाने पिशवीत डोकं घालून पाहयलं. खरंच तिथं खायचं काही नव्हतं आणि पपा त्याच्याशी बोललेलं त्याला जणू काही कळलं होतं. ते मुकाटयाने तिथून निघून गेलं. पपाला हायसं झालं. इतर मुलांना त्याने जेव्हा हा किस्सा रंगवून सांगितला होता आणि ज्यांनी प्रत्यक्ष पाहिला होता तेव्हा त्यांना त्याची गंमत वाटली.

पुढे ही मुलं खिंडसी तलावावर गेली. तिथे त्यानी जेवण केलं. गप्पां गोष्टी, खेळणं वगैरे झालं. पण हा तलाव किंवा राममंदिर वगैरेपेक्षा ही माकडंच त्यांच्या लक्षात पक्की राहिली.

# पपाची चित्रकला


❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

पपाला लहानपणापासून चित्रं काढण्याचा नाद होता तो अगदी लहान असतांना त्याला एक शिसपेन्सिल सापडली आणि त्याने व्हरांडयाची भिंत चितारून ठेवली. त्या चितारण्यामध्ये त्याच्या मते अनेक चित्रं होती. कावळा होता चिमणी होती. कुत्रा होता मांजर होती. ढग होते पाऊस होता. फक्त ते समजून घेणं कठीण होतं. पपा ते तसं आहे असं म्हणत होता म्हणून तसं म्हणायचं एरव्ही पहाणाऱ्याला त्या गोल गोल वेडया वाकडया रेषाच दिसत होत्या पण असं कुणी म्हटलं तर म्हणणाऱ्यावरच तो रागवत होता आणि त्याच्या ह्या भिंती चितारण्यावर आई रागवत होती. तिने त्याला चित्र काढायला एक वही आणून दिली पण त्या वहीत चित्र काढणं त्याला फारसं आवडलं नाही.

एक दिवस पपाचे बाबा कॉलेजमधून घरी आले तर त्यांच्या खिशात पपाला एक खडू सापडला. तो त्याने घेतला आणि त्यांच्या घराची जमीन म्हणजे शहाबादी फरशी होती त्या फरशीवर त्याने खूपसे ड्राईंग काढले. त्याकरता सुद्धा आई त्याला रागवली आणि तिने फरशी ओल्या फडक्याने पुसून टाकली. त्याचं चित्र पुसलं म्हणून तो आईवर रागवला. आईले त्याला एक छोटासा फळा आणून तो त्याचा हात सहज पोचू शकेल अशा ठिकाणी टांगून ठेवला पण फळ्यापेक्षा फरशीच ड्राईंग काढायला त्याला आवडायची कारण तिथे त्याला मोठं चित्र काढता यायचं आणि चुकलं तर चटकन पाण्याने पुसता यायचं.

खोलीभर तो लांबलचक आगगाडी काढायचा. तिला लाल रंग द्यायचा. एंजिनला काळा आणि त्यातून निघणारा धूरही काळा असे. घराचे चित्र काढतांना घराच्या उतरत्या छपराची कौलं लाल भडक असत. समोरच्या भिंतीच्या मध्यभागी एक दार आणि दोन बाजुला दोन खिडक्या असत. दारापर्यंत जाणारा रस्ता आणि रस्त्याच्या दुतर्फा झाडं! झाडावर काही पक्षी! पक्षांना कधी काळा तर कधी हिरवा रंग तो देई कारण कधी ते कावळे असत तर कधी पोपट! झाडाच्या मानाने ते खूप मोठे असायचे. तो चित्र त्याच्या

वयाच्या मानाने चांगले काढी पण त्याला प्रमाणाची कल्पना नव्हती. घराला कधी पिवळा तर कधी हिरवा रंग असायचा कारण त्याच्या घराचा रंग पिवळा होता व त्याच्या एका मित्राच्या घराचा हिरवा रंग होता. चित्रातले घर कधी त्याचे असे तर कधी मित्राचे! आकाशाला आणि पाण्याला निळा गर्द रंग असे. त्याला भडक रंगाचे कौतुक होते.



चित्रकलेची त्याची आवड लक्षात घेऊन आईने त्याला एका ड्राईंगच्या क्लासमध्ये घातले. तिथले मास्तर तिच्या ओळखीचे होते. मास्तरांनी त्याला वेगवेगळे प्राणी पटकन कसे काढायचे ते शिकविले. माणसाचा चेहरा कसा काढायचा ते सांगितले. शिवाय ओठ आणि डोळ्यांच्या आकारात थोडासा बदल करून चेहऱ्यावरचे भाव कसे बदलता येतात ते शिकविलं. चंद्रकोरीच्या आकाराचे ओठ आणि गोल गोल मोठे डोळे म्हणजे हसरा चेहरा आणि उलटया चंद्रकोरीच्या आकाराचे ओठ आणि बारीक डोळे व डोळ्यांतून गालावर ओघळणारे थेंब दाखवले म्हणजे तोच चेहरा रडका कसा दिसतो ही कल्पना त्याला खूपच आवडली होती. मग त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला हसरा चेहरा आणि रडका चेहरा त्याने काढून दाखविला होता. मास्तरांनी सांगितले १०, काढले ८, ऐकले ६, आणि मास्तरांचे तोंड पहा, एका खाली एक आकडे काढीत आणि असं म्हणत तो मास्तरांचं तोंड सगळ्यांना

दाखवीत असे.

सूर्योदयाचे चित्र काढायला त्याला खूप आवडत असे. दोन डोंगर, डोंगरामधून उगवता सूर्य, डोंगरावर व खाली झाडं, आकाशात उडणारे कावळे, समोर एखादी नदी, त्याची कल्पनाशक्ती जोरदार होती. एक दिवस त्याने जमीनीवरचे दाणे खाणारा कावळा काढला. त्या कावळ्याचं पोट खूप मोठं होतं. त्याला तसं म्हटलं तर त्यावर त्याचं लगेच उत्तर तयार! 'हे धान्य खाऊन खाऊन त्याचं पोट फुगलं आहे आणि ही चिमणी पाहिली का? हिला हा कावळा तिथले धान्य खाऊ देत नाही. तिचं पोट खपाटी गेलं आहे.' चिमणीचं एक चित्र त्याने काढले होतं.

सूर्योदयाच चित्र काढून त्यात रंग भरायला त्याला खूप आवडे. उगवता सूर्य असेल तर पिवळा रंग. मावळता सूर्य असेल तर लाल रंग द्यायचा अशी त्याची कल्पना होती. एक दिवस त्याने सूर्योदयाचे चित्र कागदावर काढून आईला दाखविले आणि ते कसे आहे म्हणून विचारले. आई त्यावर म्हणाली होती. 'चित्र चांगलं आहे पण तुझ्याजवळ कल्पनाशक्ती आहे तर हेच चित्र वेगवेगळ्या पद्धतीने काढावे. कधी डोंगर आणि आकाश, कधी झाडं आणि आकाश, बाजुला नदी किंवा शेत, शेतामध्ये चरणारी गुरं, एखादी पवनचक्की कधी मंदिर, तर कधी घर, कधी शाळा आणि शाळेत जाणारी मुलं असं छान छान काढावं म्हणजे इतर मुलांपेक्षा तुझ्या चित्राचा वेगळेपणा दिसून येईल. पपाने हे लक्षात ठेवले. त्याच्या चित्रात असा वेगळेपणा नेहमीच दिसून येई.

एकदा त्याच्या क्लासमध्ये चित्रकला स्पर्धा झाली. स्पर्धेकरता विषय दिला होता. 'ग्रामीण भागातील सूर्योदय' त्याच्या आवडीचाच विषय. ग्रामीण भागात म्हणजे रामटेकला तो सूर्योदयाच्या वेळी एक दोनदा गेला होता. तेव्हा आपल्याला काय काय दिसलं त्याची त्याने आठवण केली. त्याच्या आठवणीप्रमाणे आणि सुचलेल्या कल्पनेप्रमाणे त्याने चित्र काढले. आणि मास्तरांना दिले. दुसरे दिवशी पपा ते चित्र घेऊन घरी आला त्याने सगळ्यांना ते चित्र दाखविलं. चित्रामध्ये होते दोन डोंगर त्यामधून उगवणारा सूर्य , एका डोंगरावर मंदिर (बहुधा ते रामाचे असावे), डोंगरावरून येणारा पायऱ्यांचा रस्ता, बाजुला तलाव आणि तलावाच्या काठावर काही

मुलं उकीडवी आणि पाठमोरी बसलेली त्याने काढली होती आणि प्रत्येकाच्या जवळ एकेक डबा किंवा लोटा होता. आता ती मुलं होती की माकडं हा प्रश्नच होता. हा प्रश्न त्याला जेव्हा विचारला तेव्हा त्याने तत्काळ उत्तर देलं 'का बरं? ती माकडासारखी दिसताहेत का तुम्हाला? त्यांना शेपटया काढल्या आहेत का मी? आणि सूर्योदयाच्या वेळी माकडांना लोटा लागतो का? तो मुलानाच लागणार. आपण रामटेकला त्या दिवशी पाह्यलं नाही का आई?'

आईने चित्रात बारकाईने पाहिले. मुलाजवळ काढलेल्या लोटच्यायकडे तिचे लक्ष गेलं. त्याच्या त्या वास्तव चित्राचं कौतुक करावं की अशी चित्र खरी असली तरी काढू नये असं म्हणावं हा तिला प्रश्नच पडला होता. एवढयात त्याचे ड्राईंगचे मास्तर त्यांच्या घरी आले. त्यांनाही त्याच्या चित्रातील वेगळेपणा आणि वास्तवता जाणवली. सगळयांच्या चित्रामध्ये डोंगर, सूर्य, झाडं, नदी वगैरे होती. पण प्रातर्विधीकरता बसलेली मुलं फक्त पपानेच आपल्या चित्रात काढली होती. ग्रामीण भागातले हे दृश्य त्याने सुरेख काढलं होतं. त्याला ती मुलं काढणं सुरेखपैकी जमलं नव्हतं पण त्याच्या कल्पकतेचं आणि सुचलेली कल्पना प्रत्यक्षात उतरविल्याचं कौतुक त्यांना वाटले होत आणि त्यांनी त्याला उत्तेजनार्थ बक्षिसही दिलं होतं.

मनातल्या कल्पना चित्राद्धारे व्यक्त करण्यामध्ये अधिक कौशल्य लागतं आणि कल्पकताही लागते. पपाच्या अंगी असलेले हे गुण लक्षात येताच त्याच्या आईने त्याला चित्र काढण्याची वेगवेगळी माध्यमं म्हणजे रंगीत कागद रंगीत खडू, रंगीत पेन्सिली, जलरंग, तैलरंग, ब्रश वगैरे आणून दिली. त्यातूनच पुढे त्याची चित्रकला विकसित झाली.

❋

# पपाची रांगोळी

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

दिवाळीमधे पपाची आई अंगणामध्ये रागोंळी काढीत असे. त्याकरता ती वेगवेगळ्या रंगाची रांगोळी आणायची. कधी पानाफुलांची तर कधी थेंबांची

रांगोळी काढून त्यामध्ये ती रंगीत रांगोळी भरायची. गालिच्यासारख्या त्या रांगोळ्या अंगणामध्ये सुरेख दिसत. पपाला रांगोळीमध्ये रंग भरायला खूप आवडायचं. आई रांगोळी काढायला बसली की त्याची मध्ये मध्ये लुडबुड सुरू होई. सुरूवातीला त्याला रंगीत रांगोळी भरणं नीट जमत नसे. रेषेच्या बाहेर ती पडायची. त्यामुळे आईने काढलेली रांगोळी चांगली दिसत नसे. मग आई त्याला अंगणातच एक वेगळा चौकोन काढून तिथे रांगोळी काढायला सांगायची.

आईच्या रांगोळीसारखी रांगोळी न काढता पपा तिथे वेगळीच रांगोळी काढी. त्याला जोकर काढायला खूप आवडायचे. जोकर काढणं त्याला सोपं वाटे. तो काढतांना त्याच्या कल्पनाशक्तीला भरपूर वाव मिळे. आणि वेगवेगळे रंग त्यामध्ये भरता येत असत. जोकराच्या टोकदार टोपिला झुपकेदार रंगीत गोंडा असे. गालाला हटकून लाल रंग असे कपड्यांना वेगवेगळे रंग आणि वेगवेगळे डिझाईन असे. त्याचा जोकर कधी फुलझडया उडवीत असे तर कधी फटाक्याची लड! तो कधी लाडू खात असे तर कधी चकली. त्याचे मित्र त्याच्या जोकरची खूप तारीफ करीत असत.

दिवाळीच्या किल्यासमोर तो आणि त्याचे मित्र असल्याच खूप रांगोळ्या काढीत असत. तेव्हा सणाच्या दिवशी किंवा लहान मुलांच्या वाढदिवशी जेवतांना पानाभोवती रांगोळी काढण्या ची पद्धत होती. पानाभोवती माहिरप किंवा कमानी कमानी काढण्याऐवजी पपाने काढलेल्या रांगोळीत काहीतरी वेगळेपणा असे. त्याला रांगोळीने मोर, बदक, मासे, कमळ किंवा काही फुलं, जोकर वगैरे बऱ्यापैकी काढता येत असे. त्यामुळे मुलांच्या वाढदिवशी पानाभोवती रांगोळी काढण्याचे काम बरेच वेळा पपाकडे येई. मुलांची त्याला फर्माईश होई. 'माझ्या पानाजवळ कमळ पाहिजे.' तर एखादा 'म्हणे माझ्या पानाजवळ हत्ती पाहिजे आणि हत्तीच्या सोंडेत कमळ काढायचं,' पपाला हत्ती वगैरे नीट काढता येत नसे. मग तो म्हणायचा 'एवढा मोठा हत्ती कशाला? तो तुझ्या पानातला खाऊ भरकन खाऊन टाकेल ना! त्यापेक्षा मी फक्त कमळच काढतो. बाजुला फुलाची पानं आणि पाणीही काढतो.'

'म्हणजे माझं पान पाण्यात ठेवायचं का?' त्याचा भाबडा प्रश्न ऐकून

पपा म्हणायचा अरे खऱ्या पाण्यात नाही रे! निळ्या रांगोळीने रेघा रेघा काढल्या की ते पाणी समजलं जातं त्या पाण्यात पान ठेवायचं.'

पटकन रांगोळी काढायची असली की तो एखादी सुपारी पानासमोर ठेवून त्या सुपारीवर चिमटीने थोडी थोडी रांगोळी सोडत असे व हळूच सुपारी काढून घेई. मधल्या गोलांत लाल रांगोळी भरली की ते छोटे- छोटे गोल सुरेख दिसत. तो कधी कधी खरी पानं आणि फुलं ठेवून पानाभोवती रांगोळी काढीत असे. पपाने काढलेली रांगोळी सर्वांनाच आवडत असे.


# पपा झाडं लावतो

एक दिवस पपाकडे गाजराचा हलवा करायला बरीच गाजरं आणली होती. त्याची आई गाजरं किसत होती आणि पपाची मधेमधे लुडबुड आणि प्रश्न विचारणं चालू होतं. 'ह्या गाजरांचा रंग असाच का? ह्यांचा आकार असाच का? गाजरांची झाडं कशी असतात? त्यांना गाजरं कुठे लागतात?' वगैरे वगैरे! गाजरं झाडांना काकडी किंवा तोंडल्या सारखी वर न लागता जमिनीत लागतात हे जेव्हा त्याला कळले तेव्हा त्याला खूप आश्चर्य वाटलं आणि गंमतही वाटली. त्याच्या आईने ५- ६ गाजरांचे मुळाकडचे तुकडे कापून त्याला दिले आणि बगीच्यात लावायला सांगितले एक तुकडा कापून तिने वाटीमधे पाणी घालून ठेवला.

दुसरे दिवशी सर्व गाजरांना टोंकावर कोंब फुटल्यासारखे दिसले. तिसरे दिवशी बारीकशी पाने दिसायला लागली ४- ५ दिवसात त्याच्या फांद्या बऱ्याच उंच झाल्या आणि कोथिंबीरी सारखी नाजुक हिरवी पाने दिसायला लागली. सुरूवातीला कुतुहल म्हणून पपा त्याला नियमितपणे पाणी घालीत होता आणि त्यांचे बारकाईने निरीक्षण करीत होता एक दिवस अंगणाचं बाहेरचं फाटक चुकून उघडं राहिलं. अंगणांत एक बकरी आली आणि ती गाजराची झाडं खाऊन गेली. वाटीतलं गाजराचं झाड छान वाढत होतं. पण आता त्याचं गाजराच्या झाडाचं नाविन्य संपलं होतं. ७-

८ दिवसांनी वाटीतलं पाणी संपून गेलं आणि ते झाडही सुकून गेलं.

उन्हाळ्यामध्ये पपाच्या घरी वर्षभर पुरेल इतकी चिंच आणत असत. २-३ दिवस दुपारी ती फोडण्याचा कार्यक्रम चाले.त्यातून निघालेले चिंचोके पपाकरता ठेवावे लागत. कारण तो चिंचोके घेऊन 'एकी? का बेकी? का



फुगा?' हा खेळ आपल्या लहान भावाबरोबर व मित्रांबरोबर खेळत असे. त्या खेळामधे त्यांचा बराच वेळ छान जात असे. कधी कधी ते चिंचोके फुफाटयात भाजून ते खात असत तर कधी कधी ते चिंचोके जमिनीत पेरून त्यांची झाडं लावीत. गार हिरवा कोवळा पाला आला की तो खायला सुद्धा त्यांना आवडे. आजच्या सारखं वृक्षरोपणाचे आणि 'अधिक झाडं लावा' अशा मोहिमेचं तेव्हा महत्व नव्हतं पण ही मुले अशीच कसली कसली झाडं लावीत. पपई आणली की तिच्या काळ्या बिया वाळवून जमिनीत लावून त्यांची रोपं तयार करून तर आंबे खाल्ल्यावर त्यांच्या कोयी पुरून ती झाडे तयार करण्याचे त्याचे उद्योग चालत. कडुलिंबाच्या झाडांच्या लिंबोण्यांचा अंगणात सडा पडत असे. परिजातकाच्या मोठाल्या बिया अंगणात पडत असत. त्या बिया लिंबोण्या वगैरे सुद्धा पपा पेरत असे. वेगवेगळी झाडे लावण्याचा त्यांना नादच लागला होता. बाजार म्हणून

खेळायला ह्या लिंबोण्या म्हणजे त्यांचे आंबे असत आणि पारिजातकाच्या बिया म्हणजे त्यांचे पैसे असत. हा खेळ त्याने आपल्या लहान भावांना शिकविला होता आणि त्यांच्या बरोबर तो खेळत असे. खुपशी पाने फुलं भाजी म्हणून ही मुलं गोळा करीत असत. त्यामधे त्यांचा बराच वेळ जात असे. ह्या खेळातून पैशाचा हिशोब कसा करायचा हे त्याने आपल्या लहान भावांना शिकविले होते. कारण तो लहान असतांना त्याच्या आईने त्याला ते शिकवले होते.

एक दिवस आई बटाटे चिरत होती. त्यांतल्या काही बटाटयांना मोड आलेले होते. मग लगेच ह्या मुलांचे प्रश्न विचारणं सुरू झालं ' हे मोड म्हणजे काय? ते बटाच्यावर का येतात, केव्हा येतात? आईने त्या प्रश्नांची उत्तरं दिली आणि पपाला बटाट्याचे मोड आलेले तुकडे कापून दिले. अंगणामध्ये त्यांना एक छोटासा वाफा मातीमध्ये वाळू वगैरे घालून करायला सांगितला. वाफ्यातील जमीन बटाटे लावण्यायोग्य झाल्यावर पपाने त्या जमिनीत बटाटे लावले. थोडया दिवसात बटाट्याची झाडं जमिनीच्या वर आलेली दिसू लागली. पपाने आठ दिवसांनी २- ३ झाडे उपटून पाहिली. बटाटयाच्या झाडाला बटाटा सुद्धा लागला नव्हता म्हणून त्याची निराशा झाली. पण आईने त्याला आणखी काही दिवस वाट पहायला सांगितले. झाडांना खत पाणी देणे व्यवस्थित सुरू होतं. काही दिवसांनी पपाने खणून पाहिलं, खाली छोटे छोटे बटाटे लागले होते. काही झाडं त्याने तशीच ठेवली. त्या झाडांना लागलेले मोठे बटाटे पाहून मात्र तो खूष झाला. पपाला मिरची, धने, मेथी असली झाडं लावायलाही आवडत असे. घरची कोथिंबीर तोडून तो आईला स्वयंपाकात आणून देत असे. मोसमी फुलझाडं लावण्याचाही त्याला छंद होता. बागेत झाडं फुलांनी फुललेली असावी, काहीतरी भाजी लावलेली असावी, असं त्याला वाटे पण नियमितपणे पाणी घालण्याचा किंवा झाडांची मशागत करायचा त्याला कंटाळा येई. कुठेही नवीन झाड दिसलं की लगेच ते त्याला आपल्या बागेत हवं असं वाटे. त्यामुळे त्याच्या बागेत त्याने खूप वेगवेगळ्या प्रकारची झाडं लावली होती.

❋

# पपाच्या बागेतील नाविन्यपूर्ण झाडे

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

पपाच्या बागेत फुलाफुळांची झाडे तर होतीच पण लाडू अन् घडयाळाची झाडं सुद्धा लावलेली होती. त्याच्या शेजारी एक आजोबा रहात होते. त्यांचा पपा विशेष लाडका होता. तो त्यांच्याशी गोष्टी बोलायला आणि त्यांच्या गोष्टी ऐकायला त्यांच्याकडे वरचेवर जात असे. एक दिवस तो त्यांच्या घरी गेला. आजोबांनी त्याला लाडू खायला दिला आणि म्हटलं, 'आमच्या घरच्या झाडाचा लाडू आहे बरं का! कसा आहे? आवडला का तुला?'

घरच्या झाडाचा पेरू म्हणावा इतक्या सहजतेने त्यांनी घरच्या झाडाचा लाडू म्हटलं होतं. पपाला आश्चर्य वाटलं. तो म्हणाला, 'काय? घरच्या झाडाचा लाडू? लाडू काय झाडाला लागतात का?'

'हो! आमच्या घरी आहे लाडवाचं झाड! तुला पहायचंय?' पपाने हो म्हणताच त्यांनी गॅलरीमधलं कुंडीतलं एक झाड लाडवाचे झाड म्हणून दाखविलं. त्याला दोन कल्या लागल्या होता ते म्हणाले, 'ह्या बघ लाडवाच्या काळ्या! उद्या ह्या कळ्यांचे लाडू होतील.'

पपाला त्यावर विश्वास ठेवणे कठीन झालं तो त्यांना म्हणाला, 'आजोबा, मी उद्या झाडाला लागलेले लाडू पहायला येईन हं!'

दुसरे दिवशी सकाळी त्याच्या घरून आजोबांच्या गॅलरीतलं लाडवाचं झाड दिसत होतं. आणि त्या झाडाला खरंच दोन लाडू लागले होते. त्याने आईला बाहेर बोलावून त्यांच्याकडचं लाडवाचं झाड आणि झाडाला लागलेले लाडू दाखविले. आईला ते पहातांच आजोबांनी त्याची केलेली गमत लक्षात आली. ती त्याला म्हणाली, 'तू आता हळूच त्यांच्या घरी जा आणि ते तू स्वतः तोडून आणून मला दाखव बरं!'

पपा त्यांच्या घरी जाईपर्यंत आजोबांनी ते लाडू तोडून ठेवले होते त्यातला एक लाडू त्याला देत ते म्हणाला 'हा घे, आमच्या घरच्या झाडाचा लाडू!' आजोबा, तुम्ही कशाला तोडले ते लाडू? मी तोडणार होतो. 'हो कां? मला काय माहीत? उद्या तू ये' पपा दुसरे दिवशी आजोबांकडे गेला पण

त्या दिवशी झाडाला लाडूच लागले नव्हते. पपाची निराशा झाली. आजोबांच्या झाडाला अधून मधून एक- दोन लाडू लागायचे पण पपाला ते तोडण्याची संधी कधीच मिळाली नाही. कितीतरी दिवस त्याला खरं वाटत होतं की आजोबांच्या झाडाला लाडू लागतात. त्याने मग एक दिवस आजोबांकडच्या लाडवाच्या झाडाची फांदी आपल्या बगीच्यातील कुंडीमध्ये लावली. ते झाड छान वाढत होतं. पण त्याला लाडू लागत नव्हते. एक दिवस आईने त्या झाडाला आजोबांसारखाच एक लाडू बांधून ठेवला. तो लाडू पहाताच पपाला खूप आनंद झाला. पण जवळ जाताच त्याच्या ते लक्षांत आलं. आईने त्याला सांगितलं.

'अरे! आजोबांच्या झाडालाही असेच लाडू लागत होते.' पपाचं झाडं लावण्याचं अनुकरण त्याचे धाकटे भाऊ सुद्धा करीत असत. एक दिवस त्याच्या लहान भावाने असंच कसलं तरी चूपचाप झाड लावलं. झाड म्हणजे बहुधा कशाची तरी बी असावी. तिथे तो नियमितपणे पाणी घालीत होता पण झाड काही जमिनीवर उगवलेलं दिसत नव्हतं. एक दिवस त्याचा भाऊ त्या जागेवर पाणी घालीत होता. त्याला एक छोटसं झाडं तिथे दिसलं. तो तिथला पाला पाचोळा बाजुला करून त्या झाडाला छान आळं करणार होता तेवढ्यात तिथे जमिनीत पपाला काही तरी चमकलेलं दिसलं. तो तिथे गेला आणि जमिन उकरून पहायला लागला पपा ला त्याचा भाऊ त्याला लगेच म्हणाला 'अरे दादा, थांब थांब, तिथे तू उकरू नकोस मी तिथे घड्याळाचं झाड लावलं आहे आणि मला वाटतं, ते आता हळूहळू वर येतयं.'

'घडयाळाचं झाड? म्हणजे जमिनीत तू काय लावलं?' पपाने त्याला विचारलं त्यावर तो म्हणाला, 'अरे, आई च्या हातातलं घडयाळ तिथे मी जमिनीत पुरलं आहे. त्या झाडाला बटाटयासारखी जमिनीत घडयाळं लागली असतील असं मला वाटलं.'

लाडवाचं झाड नसतं तसंच घडयाळाचं ही झाड नसतं. हे पपाला कळायला लागलं होतं. तो म्हणाला, 'अरे दीडशहाण्या, घडयाळाचं झाड असं लागतं का कुठे? थांब, मी आता आईला तुझं नाव सांगतो. आई गेले आठ

दिवस म्हणतेय की माझं घडयाळ कुठे आहे? माझं घडयाळ कुठे आहे? ते दिसत नाहीय! ते इते जमिनीत पुरल्यावर आईला ते कसं दिसणार?'

पपाने ते घडयाळ जमिनीतून काढून आईला नेऊन दिलं. आणि तिच्याजवळ झाडाचं रसभरीत वर्णन केलं.

2000 7/8/83


## पपा फुग्यांशी खेळतो

पपाला फुग्यांशी खेळायला खूप आवडत असे. रबरी फुगे, साबणाचे फुगे किंवा कागदाचे फुगे! कोणत्याही फुग्यांशी तो खेळायचा, रंगीबेरंगी, वेगवेगळ्या आकाराचे फुगे घेऊन फुगेवाला समोरून येतांना दिसला की तो आपल्या आईला व्हरांडयात बोलवी आणि फुगेवाल्याला हाक मारून आईला त्याच्याकडून फुगे घ्यायला लावी. अशा वेळी केव्हातरी आईने त्याला शिकविलेलं फुग्याचं गाणं म्हणणं तो सुरू करी -

*फुगा हवा फुगा*  
*फुलासारखा लाल लाल*  
*पानासारखा हिरवा हिरवा*  
*फुगा हवा फुगा।*  
*चेंडूसारखा गोल गोल*  
*काकडी सारखा लांब लांब*  
*फुगा हवा फुगा।*

तो कधी गॅस भरलेले तर कधी साधे फुगे घेई. कधी लहान तर कधी मोठे, वेगवेगळ्या रंगाचे आणि वेगवेगळ्या आकाराचे त्याला फुगे हवे असत. बाबा बाजारांत जायला निघाले की त्यांना सुद्धा तो वेगवेगळे फुगे आणायला सांगायचा. फुगे खेळण्यात त्याचा कितीतरी वेळ छान जात असे. फुग्याला

दोरा बांधून तो फुगा तो पतंगासारखा उडवी आणि त्यावेळी तो प्रसंगानुरूप स्वरचित गाणी म्हणे! 'फुगा हवा फुगा' ह्या ऐवजी 'फुगा उडवा फुगा' आणि पुढे ज्या रंगाचा आणि ज्या आकाराचा फुगा असेल तशी ओळ तो म्हणायचा. लाल लाल रंगाचा किंवा गोल गोल आकाराचा फुगा- उडवा फुगा!



तो आणि त्याचा मित्र दोघेजण दोन फुगवलेले फुगे हातात घेऊन ढिशांव ढिशांव करून मारामारी करीत असत मारामारी करतांना ज्याचा फुगा फुटला तो हरला असा त्यांचा खेळ असे. नंतर फुटलेल्या फुग्याच्या रबराचे ते तोंडात घालून हवा आत ओढून त्याला पीळ घालून छोटे छोटे फुगे करायचे आणि ते एकमेकांच्या कपाळावर फोडायचे हाही त्यांचा खेळ चाले. नळाच्या तोटीला फुगा लावून त्यामध्ये तो पाणी भरी आणि या फुग्याने एकमेकांच्या अंगावर पाणी उडवी - विशेषतः होळीच्या सुमारास रबरी नळीने रंगीत पाणी भरून तो फुगा हळूच खिडकीतून वगैरे मित्रांच्या अंगावर टाकीत असे. त्यांच्या घरी पळसाचं झाड होतं. झाडाची खूपशी फुलं रोज अंगणात पडत ती गोळा करून त्याचा होळीला रंग करून तो पिचकारीने किंवा फुग्याने उडवायला त्याला गमत वाटे. नंतर मात्र त्याला रंग खेळणं आवडेनासं झालं. त्या दिवशी तो चूपचाप कुणाकडे तरी रहायला जात असे.

पपा फुगे फुगविण्यात पटाईत होता. एखाद्याच्या वाढदिवसाला किंवा बारशाला वगैरे फुग्यांची सजावट करायची असली तर त्यावेळी फुगे फुगवायचं काम पपाचं असे. त्याच्या आईबाबांना त्याच्या इतके भरभर फुगे फुगवता यायचे नाही. कंटाळा यायचा. तोंड दुखून यायचं. मग पपा म्हणायचा 'तुमच्या गालात हवा नाही आणि जोर नाही म्हणून तुम्हाला लवकर फुगे फुगवता, येत नाही.' पपाच्या गालांची ठेवण फुगा फुगवल्यासारखी फुगीर होती. त्यामुळे त्याच्या गालात खूप हवा आणि ताकद आहे असं त्याचं मत होतं.

रबराच्या फुग्यांप्रमाणे साबणाचे फुगे करायला आणि ते उडवायला पपाला खूप गमत वाटे. वाटीत साबणाचं पाणी करायचं आणि त्यामध्ये कागदाची किंवा काचेची पुंगळी घालायची नंतर पुंगळीत हळूच फुंकर घालून बुडबुड करायचे. संबंध वाटी रंगीबेरंगी पातळ पारदर्शक आवरणाच्या छोटया छोटया फुग्यांनी भरून जायची. उन्हामध्ये ते रंग खूप छान दिसायचे. हळूहळू एकेक फुगा फुटायचा. त्या पाण्यात पुंगळी घालून ती बाहेर काढून हळूच फुंकर घातली की पुंगळीच्या टोकाशी सुरेख फुगा व्हायचा. असे फुगे तो पुष्कळ वेळा गच्चीवरून सोडायचा. थोडासा वारा असला की ते फुगे दूरवर जायचे तेव्हा फार सुंदर दिसत.

साबणाचे फुगे उडवायला बरचिशी मुलं गोळा होत तेव्हा कुणाचा फुगा मोठा होतो. कुणाचा फुगा जास्त लांब जातो. कुणाचा फुगा जास्त वेळ टिकतो असे त्यांचे खेळ चालत.

एकदा पपा आपल्या आईबाबां बरोबर जबलपूरहून नागपूला लग्नाला गेला होता. तो नेहमी नागपूरला त्याच्या आजी- आजोबांकडे जात असे त्यामुळे नागपूर म्हणजे आजीआजोबांचं घर अशी त्याची कल्पना होती. लग्नाला दोन दिवस एका कार्यालयात जायचं होतं. तिथे रहायला तो काही तयार झाला नाही. तो सारखी आईच्या मागे कुरकुर करीत होता की 'आपण नागपूरला जायचं, इथे नाही' आईने त्याची खूप समजूत घातली की 'हे कार्यालय म्हणजे नागपूरातलंच आहे.' पण त्याची समजूत पटेना. मात्र त्याच्या हेही लक्षात आलं की आपण इथे दुसरीकडे जाण्याकरता कितीही हट्ट केला तरी आई काही आपल्याला कुठे घेऊन जाणार नाही. मग त्याने आपला वेळ जाण्याकरता म्हणून आईला साबणाचे फुगे करण्याकरता साबणाचं पाणी

मागितलं. एवढ्या गडबडीत आई त्याला साबणाचं पाणी वगैरे कुठून देणार? तिने तसं त्याला म्हटलं. बाजुलाच एक पाहुणे आजोबा दाढी करीत बसले होते. त्यांनी त्याला बोलाविले. आणि एक वाटी घेऊन यायला सांगितले. पपाने वाटी आणून देताच त्या वाटीत आपल्या जवळच्या ग्लासमधलं पाणी घातलं आणि दाढीचा साबण त्यामध्ये फिरवून साबणाचं पाणी करून दिलं. वर्तमान पत्राच्या एका कागदाच्या चारपाच पुंगळ्या करून दिल्या. पपा एकदम खूष झला. कारण साबणाचे फुगे करणे, मधूनमधून त्या फुग्याचं रसभरीत वर्णन करणे आणि स्वतःचे आजोबांकडून आणि इतरांकडून होणारं कौतुक यामध्ये त्याचा कितीतरी वेळ छान गेला. त्याची आणि त्या आजोबांची थोडचाच वेळ्रात गट्टी जमली.

त्या आजोबांनी त्याला कागदाचे फुगे कसे करायचे तेही शिकविले. कागदाच्या बोटी, विमानं वगैरे तो करीत असे. पण त्याला असे फुगे करता येत नव्हते. त्याने असे खूपसे फुगे तयार केले. एक फुगा एका तळहातावर ठेवून वरून दुसरा हात जोराने मारला की तो फुगा फुटायचा आणि फटाक्यासारखा फटकन आवाज व्हायचा. त्याची त्याला खूप गमत वाटली होती. मग हळूच कुणाच्या तरी बाजुला जाऊन तो कागदी फुगे फटकन फोडायचा आणि अनेपक्षित आवाजाने ती व्यक्ती घाबरली, निदान तिने तसं दाखयवलं म्हणजे हा खूष व्हायचा.

हॉलची सजावट करायला आणि पपाची व इतर लहान मुलांची करमणूक व्हायला म्हणून त्या आजोबांनी खूपसे रंगीबेरंगी फुगे आणले. ते फुगे फुगविण्यात अर्थात पपाच अग्रेसर होता.

❋

# पपाचा हटवादीपणा

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

पपा स्वभावाने शांत होता पण एकसारख्या त्याच्या मनाविरूद्ध गोष्टी घडत गेल्या तर तो तितकाच हटवादी पण होता. एकदा तो आणि त्याचा लहान भाऊ त्याच्या आईबाबांबरोबर पुण्याला एका लग्नाला गेले होते.

पुण्याला जाणार म्हटल्याबरोबर त्याच्या आईच्या बाबांनी आपल्या लेकीला म्हटलं होतं.

'अग, तू त्या कर्वे रोडवरच्या काकांकडे जाऊन ये बरं का! लहानपणी आम्ही खूप वर्षे एकत्र राहिलोय. त्याचा मोठा पेट्रोलपंप आहे. जवळच त्याने मोठं घरही बांधलंय म्हणे! आणि आत्याचं घरही त्या बाजुला आहे तिच्या यजमानांचा मोठा प्रेस आहे. चांगला नावारूपाला आला आहे. तिथे आमची एक मामी रहाते. तिला पण भेटून ये. त्यांना बरं वाटेल तुम्हाला पाहून आणि ही यादी आणखी वाढलेलीच होती. कारण त्यांचं लहानपण पुण्यालाच गेलेलं होतं. शिक्षणही तिथे झालं होतं. नोकरीनिमित्त त्यांना पुणे सोडावं लागलं होतं. पण त्यांचे काही नातलग अजूनही तिथे होते. सुरूवातीला त्यांचं पुण्याला बरंच जाणं होई पण नंतर ते कमी झाल आणि मग ते बंदच झालं. काही निमित्ताने किंवा वर्षाकाठी एखाद दुसरं पत्र एकमेकांकडे येत जात असे.

पपाच्या बाबांच्या आईनेही अशीच चार पाच नातलगांची नावं आणि पत्ते दिले होते. की जिथे जाणं त्यांना जरूरच होतं.

वाटेतला प्रवास, एकदोन ठिकाणचा मुक्काम आणि पुण्याला लग्न होईपर्यंतचा कार्यक्रम पपाला आणि त्याच्या भावाला ठीक वाटला पण हळूहळू त्यांना कंटाळा येऊ लागला. लग्नघरून ते एका आजोबांकडे रहायला गेले होते. ते त्याचं खूप कौतुक करीत पण ते घरी फारच थोडा वेळ असत. आजी त्यांना खायला प्यायला देई पण त्यांच्याशी गप्पा वगैरे करणं त्यांना जमलं नाही. तिथे आणखी कोणी मुलं नव्हती त्यामुळे दिवसभर घरी काय करावं हा मुलांना प्रश्न पडे! आई बाबांबरोबर कुणाकुणाकडे जायची इच्छा नसली तरी त्यांना जावं लागे. आईबाबा ज्यांना सांगतील त्यांना त्यांना वाकून नमस्कार करावा लागे.

'तुझं नाव काय? कोणत्या शाळेत जातो? कोणत्या वर्गात आहे?' असे एक दोन प्रश्न ह्या मुलांना ते विचारीत आणि स्वतःच्या गप्पामध्येच असे रंगत की बाजुला ही दोन लहान मुलं बसली आहेत ह्याचा जणू त्यांना विसर पडे. त्यामुळे ह्या मुलांना कुणाकडे जाणं अतिशय कंटाळवाणं वाटे. पपाने आपल्या आईजवळ हे बोलूनही दाखविलं पण आईने तिकडे लक्षच दिलं

नाही. आणि दुसरे दिवशी ती पुन्हा एका काकांकडे जायची तयारी करू लागली. ते पहातांच पपा, आईला म्हणाला, 'आई, आम्ही त्या काकांकडे मुळीच येणार नाही.' 'अरे, तुम्हाला तिथे कंटाळा येणार नाही. कारण तिथे तुमच्याच वयाची त्यांची दोन मुलं आहेत.'

त्या मुलांची नाव काय आहेत?'

'नांव मला माहीत नाही.'

'तुला त्या मुलांची नावं सुद्धा माहीत नाहीत मग आम्ही नाही येणार तिथे'

'अरे, पण नावाचा आणि येण्या न येण्याचा संबंध काय? आईने थोडसं चिडूनच विचारलं 'संबंध आहे! मुलांची नावं सुद्धा माहीत नाही त्या घरी आम्ही नाही येणार'.

'तिथे गेल्यावर आपण त्यांना विचारू. त्यात काय एवढं?'

'नाही, आम्ही येणार नाही म्हणजे नाही' त्याने ठासून सांगितलं 'येणार नाही म्हणजे काय? तुम्हाला यावचं लागेल. आईनेही तितकंच किंबहुना थोडसं जास्तच ठासून सांगितलं. 'आम्ही बाहेर गेल्यावर तुम्ही इथे कुठं रहाणार आहात? आधीच तुम्ही इथे खूप दांडगाई करायला लागला आहात. आजी कुठे कुठे लक्ष देणार? आम्ही नसतांना तर काही पहायलाच नको.' असं मनाशीच म्हणत ती पपाच्या लहान भावाला बाहेर जायचे कपडे घालू लागली. मग पपालाही मोठया नाराजीने तयार व्हावचं लागलं.

सगळेजण तिथे गेले. नमस्कार चमत्कार झाले. त्यांच्या बरोबरची जी मुलं होती त्यांना तिथे पपाच्या आईने मुद्दाम ओळख करायला बोलावलं ती आली. त्यांची नांव विचारली ती त्यांनी सांगितली आणि दोन मिनिटं बसून तिथून निघून गेली. त्यांनी काही ह्या मुलांना बाहेर खेळायला बोलावलं नाही. पपाला तो आपला अपमान वाटला. आईने त्याला त्यांच्यामध्ये खेळायला बाहेर जा म्हटलं पण आपणहून तिथे जायला त्याला मुळीच आवडलं नाही. तो घुम्यासारखा तिथे बसुन राहिला. त्यामुळे, त्याच्या लहान भावाला काय करावं हे, सुचेना. त्याने घरी चल, घरी चल' म्हणून आईमागे भुणभुण सुरू केली. नियोजित वेळेपेक्षा त्यांना लवकरच घरी जावं लागलं.

दुसरे दिवशी त्यांना एका आत्याकडे जायचं होतं. तिथे तर ह्या

मुलांना नेणं भागच होतं. ही मुलं थोडीशी नाराजीनेच तिथे जाण्याकरता तयार झाली.

'तिथे विचारलेल्या प्रश्नांचीनीट उत्तर द्या बरं का! घुम्यासारखं नुसतं बसू नका आणि गेल्या गेल्या घरी चल म्हणून हट्टी करू नका?' आईचं दोन्ही मुलांना सुचना देणं चालू होतं. 'आणि गेल्यावर आत्याला आणि आजोबांना वाकून नमस्कार करा' पुन्हा पुन्हा हे ऐकून पपाची सहनशक्ती जणू काही संपुष्टात आली. तो ताडकन म्हणाला 'कोणती आत्या काळी की गोरी आतापर्यंत माहीत नव्हतं, कोणते आजोबा ठेंगणे की उंच माहीत नव्हते त्यांना म्हणे वाकून नमस्कार करा. सारखा सारखा कसला नमस्कार करायचा? आणि तोही वाकून! छट आपण नाही बुवा करणार'

'कां? वाकून नमस्कार केल्यामुळे तुझं कंबरडं दुखलं वाटतं?' आई रागानेच म्हणाली 'आणि ते दुखलं तरी मोठया माणसांना असा नमस्कार करण्याची रीत आहे. ती आपण पाळली पाहिजे.' आई सहसा रागवत नसे. ती रागवली म्हणजे आपलं काहीतरी चुकत असावं असं पपाला वाटलं आणि तो काहीही न बोलता आईबाबांबरोबर जायला तयार झाला. तिथे गेला. वाकून नमस्कार केला. आणि नेहमीप्रमाणे ही दोघं मुलं, बाजुला आहेत ह्या कडेत्या माणसाचं दुर्लक्ष झालं. तिथे एक चित्राचं पुस्तक पडलं होतं. ते पपा पहात बसला. त्या पुस्तकामध्ये त्याच्या भावाने डोकं घातलं. कारण तिथे बसून तोही कंटाळला होता. त्यांचं भांडण आणि ढकलाढकली सुरू झाली. भांडणापेक्षा त्यामध्ये स्वतःची करमणूक करून घ्यायचाच जास्त प्रकार होता पण पहाणाऱ्यांना ती मारामारीच वाटत होती.

'अरे, अरे, मारता काय असे एकमेकांना दोघं मिळून ते पुस्तक पहा. नाही तर थांबा, मी तुम्हाला आणखी एक पुस्तक आणून देते.' त्यांच्याकरता पुस्तक आणून द्यायला आत्या उठली. आईला त्यांच्या मारामारीची लाज वाटली. तिच्या मनांत विचार आला ही मुलं घरी तर असं करीत नाही. नेमकं दुसऱ्यांकडे असं वेडयासारखं वागतात. त्यांना काय वाटेल आईने मुलांना नीट वळण लावलं नाही. ती पपाकडे डोळे वटारून पाहात होती. पण पपाचं आईकडे लक्षच नव्हतं दुसच्याचं आपल्याकडे त्याला लक्ष वेधवता आलं हा त्याला जणू आपला विजय वाटत होता. आपल्याकडे लक्ष केंद्रित


करण्याचं एक प्रभावी तंत्र त्याला गवसलं होतं. त्याच्या मानसशास्त्राच्या दृष्टिकोनांतून ते कदाचित सर्व ठीकच असेल पण आईच्या मानसशास्त्राचं काय, पुण्याला आणखी एक दोन ठिकाणी त्याने ह्या तंत्राचा जरी उपयोग केला आणि आईची बोलणी खाल्ली तरी नागपूरला घरी आल्यावर मात्र त्याला ह्या तंत्राचा वापर कधीच करावा लागला नाही.

## पपाची सायकल रेस

पपाला त्याच्या तिसऱ्या वाढदिवशी त्याच्या आईबाबांनी एका सायकल दुकानात नेले आणि त्याला आवडलेली एक लाल रंगाची तीन चाकी सायकल त्याला वाढदिवसाची भेट म्हणून दिली. त्या सायकलला एक घंटी लावलेली होती. सुरूवातीला त्याला सायकल चालवणं जमत नव्हतं कारण त्याचे पॅडलपर्यंत पाय पुरत नव्हते. पण त्याला घंटी वाजवता येत होती. त्यामुळे तो सायकल हातात घेऊन किंवा सायकल वर बसून पॅडल मारण्याऐवजी पाय जमिनीवर टेकवत टेकवत व्हरांडयातून पुढे जायचा आणि वाटेमध्ये कोणी आलं की 'बाजु हटो, बाजु हटो,' असं म्हणत घंटी वाजवायचा.

हळूहळू त्याला सायकल चालवणं जमु लागल तो आपल्या बरोबर खेळण्यातल्या सशालाही सायकल वर बसवत असे. त्याच्याशी बोलत बोलत तो सायकल चालवी. घराला समोर मोठा व्हरांडा होता. त्या व्हरांडयातच त्याचा काल्पनिक भाजी बाजार, काल्पनिक ब्रेडचं दुकान, काल्पनिक शाळा वगैरे असे. आपल्या ह्या सायकल वर बसून ती जोराने चालवीत ह्या दुकानातून तो आईला सामान आणून द्यायचा. त्याकरता त्याच्या हॅण्डलला एक छोटीशी कापडी पिशवी लावलेली असायची. कधी कधी तो सायकलवरून शाळेतही जाऊन यायचा, एकदा तो आपल्या नातलगाकडे रहायला गेला. गणपती उत्सवाचे दिवस होते. तिथे व शेजारी त्याच्या वयाची बरीच मुलं होती. ती तीनचाकी सायकल चालवीत असत. गणपती उत्सवात ह्या लहान लहान मुलांकरता तीन चाकी सायकलची रेस ठेवली होती. पपाला त्या

रेसमध्ये भाग घ्यावा वाटला. पण त्याची स्वतःची सायकल इथे नव्हती. मग एका मुलाने त्याला आपली सायकल दिली. ती थोडी मोठी होती. त्या सायकलवर बसायची पपाला प्रॅक्टीस नव्हती. तरीपण त्याने रेसमध्ये भाग घेतला. त्याने जोरात सायकल चालवायचा प्रयत्न केला पण त्याचा वरचा नंबर आला नाही. त्याला थोडं वाईट वाटलं. ज्याचा पहिला नंबर आला



होता त्याच्या जवळ त्याने म्हटले 'माझी नेहमीची सायकल असती तर माझा नक्कीच पहिला नंबर आला असता!' त्या मुलाला त्याचं हे म्हणणं काही फारसं आवडलं नाही. त्या मुलाने पपाला ऐकू जाईल असं म्हण दुसऱ्या एका मुलाजवळ म्हटलं 'नाचता येईना अंगण वाकडं' त्या मुलाचं हेबोलणं ऐकताच पपा थोडया रागाने त्याला म्हणायला 'मला जोराने सायकल चालवता येत नाही असं म्हणायचं आहे का तुला? मला दुसरी थोडी लहान सायकल दे, बघ मी तुझ्यापुढे जातो की नाही!' तो मुलगाही जिद्दीला पेटला त्याने पपाला दुसरी लहान सायकल दिली पपाने ती सायकल एकदा चालवून पाहिली आणि मग त्या दोघामध्ये रेस झाली. ती रेस बाकीच्या मुलांनी मोठया उत्सुकतेने पाहिली त्या रेसमध्ये पपाच जिंकला. पण उत्सवाच्या रेसमधलं बक्षीस मात्र त्या दुसऱ्या मुलालाच मिळाले.

पपा ७-८ वर्षाचा झाल्यावर तो आपल्या बाबांची दोन चाकी सायकल चालवायचा प्रयत्न करू लागला ती सायकल त्याच्या मानाने मोठी होती. त्याला ती जड पडायची. तेव्हा मुलांकरता घरोघरी लहान सायकल घेण्याची पद्धत नव्हती. कधी कधी भाड्याने लहान सायकल आणीत असत. मोठ्या सायकलवर नुसतं हॉपींग करतांना सुद्धा पपा २-३ वेळा पडला होता. पण रडला नव्हता. इतकचं काय पण हातापायाला खचलेलं आईला त्याने दाखवलं सुद्धा नव्हतं. चूपचाप स्वतःच औषध लावलं होतं.

पपाचे आईबाबा व शेजारची मोठी मुलं त्याला पद्धतशीर सायकल शिकवूं लागले. प्रथम् नुसतंच हॉपींग करून बॅलन्स शिकणं! उतारावून असं जातांन्या त्याला खूप मजा वाटायची. असं जातांनाच मध्ये पाय घालून अर्ध पॅडल मारणं, मग पूर्ण पॅडल मारणं आणि नंतर सीटवर बसून सायकल चालवणं त्याला जमू लागलं. सीटवर बसता आलं तरी त्याला आपल्या मनाने सहजपणे कित्येक दिवसपर्यंत उतरता येत नव्हतं. उतरायचं म्हणजे कोणी तरी त्याची सायकल धरावी लागे किंवा तो हळूच तिरपा होऊन ती सायकल खाली बाजूला टेकवायचा आणि मग उतरायचा. सीटवर बसला तरी त्याचे पाय पॅडलपर्यंत पुरत नव्हते म्हणून तो अर्ध पॅडलच मारायचा किंवा मध्ये पाय घालून सायकल चालवायचा.

तो चवथीच्या वर्गात असतांना त्यांच्या स्नेह सम्मेलनामध्ये सायकलची रेस होती. तोपर्यंत त्याला बऱ्यापैकी सायकल चालवता येऊ लागली होती. त्याने त्या रेसमध्ये भाग घेतला पण रेसच्या आदल्या दिवशीच त्याला कळलं की ती स्लो सायकलींग ची रेस आहे. सायकल रेस म्हणजे पुष्कळ मुलांना वाटलं होतं की ती फास्ट सायकलींग रेसच असेल. काही मुलांना जलद सायकल चालवायचीच रेस हवी होती शिवाय रेसमध्ये स्लो सायकल असं सुरूवातीला मास्तरांनी सांगितलं नव्हतं. मग त्यांनी खूप आरडोओरडा केला. त्यात पपाही सामील होता. कारण त्याला हळू सायकल चालवायची प्रॅक्टीस नव्हती. मास्तरांनी त्या मुलांना सांगून पाहयलं की 'सायकल हळू चालवता येणं ह्यात सुद्धा कौशल्य आहे.'

त्यावर पपा म्हणाला होता 'सर, सायकल हळू कशाला चालवायची? हळू जायचं असेल तर पायीच जावं. सायकल म्हणजे कशी फास्टच चालवायला

हवी. हो की नाही रे?' त्याने शेजारी उभ्या असलेल्या मुलांना विचारलं. त्यांनी अर्थातच त्याच्या म्हणण्याला मोठ्याने होकार दिला.

मास्तरांनी एकदा स्लो सायकलिंग रेस म्हटलं होतं त्यामुळे त्यांना ती स्पर्धा तर ठेवायचीच होती पण मुलांच्या आग्रहाकरता त्यांनी फास्ट सायकलींग रेस - ठेवली पण एका अटीवर! मुलांनी दोन्ही रेसमध्ये भाग घेतला पाहिजे. मुलं कबूल झाली. आणि गॅदरिंगमध्ये दोन्ही स्पर्धा झाल्या. फास्ट सायकलींग रेसमध्ये पपाचा दुसरा नंबर आला पण स्लो सायकलींग रेसमध्ये बॅलन्स सांभाळता सांभाळता अर्ध्या अंतरावरच तो पडला. गुडघ्याला आणि कोपराला बरंच लागलं तेव्हा त्याच्या लक्षात आलं की मास्तर म्हणत होते त्याप्रमाणे हळू सायकल चालविता येणं यात ही खरंच कौशल्य आहे.

# पपाची मुंज

वयाच्या आठव्या वर्षी साधारपणे मुलांची मुंज करतात पण कधी कधी ती नंतरही करतात. पपाच्या पाठोपाठ त्याचा भाऊ चार वर्षांनी लहान होता. तेव्हा त्याच्या आठव्या वर्षी दोघांची एकदम मुंज करायचे ठरले. त्या वेळी पपाचे अर्थातच बारावं वर्ष चालू होतं.

मुंजीकरता घरासमोर मांडव घातला होता. दोन्ही मुलांकरता नवीन कपडे केले होते. पंचे, टोप्या, लंगोटया, मुडांवळी जानवी वगैरे आणले होते. उन्हाळ्याची सुटी असल्यामुळे घरी खूप पाहुणे आले होते. फराळाकरता खूपसे पदार्थ करून ठेवले होते. त्यामुळे मनसोक्त खेळणं आणि खाणं चालू होतं. पपाचा भाऊ लहान होता म्हणून घरातली माणसं त्याला मुंजीमध्ये त्याची मांडी कापून बेडूक भरण्यावरून चिडवीत होती. असं कोणी करणार नाही असं त्याला मनांतून वाटत होतं. तरीपण वरचेवर चिडविल्यामुळे थोडीशी भीतीही वाटत होती. 'खरंच आपल्या पायात बेडूक घालणार की काय? शिवाय तो जर पायामध्ये टुणटुण उडया मारायला लागला तर आपलं आणि आपल्या पायाचं काय होईल?' असे प्रश्न त्याला सतावीत होते. बेडूक

पायामध्ये खरंच भरतात का असं विचारण्याजोगं घरामध्ये कोणी नव्हतं. त्याने एक दोघांना विचारून पाहयलं पण त्यावरून त्याला आणखीच चिडवलं गेलं. त्याने मग पपाला विचारलं 'अरे दादा, खरंच बेडूक भरतात का रे पायामध्ये?' 'हट् रे! बेडूक बिडूक काही भरत नाही. उगीच चिडवतात झालं' पपा निर्विकारपणे म्हणाला.

'पण असं कशाला चिडवतात?' भावाने त्याला विचारलं. 'काही तरी चिडवायचं म्हणून चिडवतात' असं पपाने गुळमुळीत उत्तर दिलं. ह्या उत्तराने पपाच्या भावाचं समाधान झालं नाही. पण बेडूक भरत नाही असं कळल्यामुळे त्याला बरं वाटलं. पण तरी त्याविषयी तो थोडा साशंकच होता.

मुंजीच्या आधी कांही दिवस पपाच्या भावाचे समोरचे दोन दात पडले होते. तो हसला की तोंडाचं बोळकं कसं गमतीदार दिसे. त्यावरून त्याला घरातली माणसं चिडवीत असत. पण तो चिडत नसे. त्याला हसू आलं तरी तो प्रयत्नपूर्वक ओठ बंद ठेवून पडके दात दिसणार नाही अशा बेताने हसायचा. तेही मोठं गमतीदार दिसे. त्यांच्या घरी एक वृद्ध नातलग पाहुणे आले होते. त्यांचे दात पडले होते. ते दाताची कवळी लावीत ती पाहून पपाने आपल्या आईला विचरिले होते की आपण ह्या भावाकरता दोन दातांची कवळी आणायची का?

मुंजा मुलांचा चप्पीगोटा करून मागे घेरा आणि शेंडी ठेवण्याची जुनी पद्धत आहे. पुष्कळ मुलांना असा घेरा आणि शेंडी वगैरे आवडत नाही कारण शाळेमध्ये मुलं चिडवतात आणि डोक्यावर टिचक्या मारतात. त्यामुळे ही पद्धत तितकी कटाक्षाने पाळली जात नाही. काही पालक मात्र मुलांना अशी कटींग करायलाच लावतात. आयुष्यात एकदाच तर अशी कटींग करायची ती ह्यावेळी केली पाहिजे. लगेच तर डोक्यावर हिरवळ उगवते असं त्यांचं म्हणणं! ह्या दोघा मुंजामुलांनी कशी कटींग करायची ते त्यांच्यावरच सोपवलं होतं. घेरा शेंडी ठेवलीच पाहिजे असा त्यांच्या आईबाबांचा आग्रह नव्हता.

मुंजीचा मुहुर्त सकाळी लवकरचा होता, कटींग करण्याकरता न्हाव्यालां घरीच बोलावलं होतं. पपाच्या भावाला घेरा शेंडी वगैरे हवं होतं पण पपाला ते मुळीच पसंत नव्हत. त्याने ग्रासकट करायचं ठरवलं होतं. कटींग, अंघोळ

वगैरे भरभर उरकायला हवं होतं. त्या न्हाव्याने आपल्या धोपटीतून हत्यारे बाहेर काढली आणि काही न बोलता दोघांची भराभरा कटींग केली. न्हाणी घरांत दोघांच्या अंघोळीचे पाणी तयार होते. त्यांना कुणीतरी अंघोळी घालून टॉवेल गुंडाळून बाहेर आणलं. पपाने सहज आरशात पाहलं. क्षणभर त्याला हा आपलाच चेहरा आहे हे ओळखता येईना. कारण चेहऱ्यावर नाक डोळे तर आपलेच पण समोरून अगदी तुळतुळीत कटींग, डोक्याच्या मध्यभागी घेरा आणि त्या घेऱ्यातून डोकावणारी छोटीशी शेंडी! ते पाहून त्याला एकदम हुंदका फुटला. तो रडायला लागला. 'मला अशी कटींग करायची नव्हती. आई मला केस पाहिजे.' असं म्हणत त्याने रडणं चालू ठेवलं. तो पटकन कपडे घालीना. इकडे मुंजीच्या मुहुर्ताची वेळ जवळ आली. पण त्याचं आपलं एकसारखं तेच सुरू 'मला केस पाहिजे' त्याची समजूत घालणं मुश्कील झालं. ऐन वेळी त्याला केस कुठले आणायचे? त्याची समजूत घालायचा पुष्कळ प्रयत्न झाला 'अरे ते अमुक अमुक तेल आहे ना ते डोक्याला लाव आठ दिवसात केस येतील.' त्यावर त्याचं आपलं एकच म्हणणं 'मला आता केस पाहिजे.' त्याच्याकरता विग आणा असंही कोणीतरी थट्टेने सुचविले. शेवटी त्याच्याकरता एक छानसी टोपी कुणीतरी आणली. पण त्यावेळी पपाचा मूडच गेला.

पपाच्या भावाला मात्र ही सगळी मजा वाटत होती. मांडी कापून बेडूक वगैरे भरला नाही म्हणून तो खूष होता. ठरल्याप्रमाणे दोघांच्याही मुंजी झाल्या. त्यांना मुंजीची छान छान प्रेझेंटस् मिळाली. त्यांचे पुष्कळसे फोटो काढण्यात आले. पण पपाने आपला एकही फोटो नीट येऊ दिला नाही. तो नेमका त्यावेळी हात तरी वर करायचा, पाय तरी हलवायचा. मग त्याला टोपी घालायला दिली. ते फोटो चांगले आले. मुंज धडाक्यात झाली. पण काही जणांच्या मते त्यात दोन त्रुटी राहिल्या. एक म्हणजे पपाला ताबडतोब डोक्यावर केस आणून द्यायला हवे होते. आणि दुसरं म्हणजे त्याच्या भावाकरता समोरचे दोन दात!

पपाच्या मुंजीतल्या खुपशा आठवणी नंतर सुद्धा निघायच्या. अगदी त्याच्या मुलाच्या मुंजीमध्ये सुद्धा निघाल्या होता. पण ह्या आठवणीपैकी त्याची 'केस पाहिजे' ची आठवण मात्र सर्वांच्याच मते अविस्मरणीय आठवण

होती.

❋

# पपा जेव्हा छोटा होता

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

पपा वयाने जरी छोटा होता तरी त्याच्या भावंडांमध्ये तो पहिलम् प्यारा असल्यामुळे मोठा समजला जात होता. म्हणजे एकाच वेळी तो छोटाही होता आणि मोठाही होता. भावंडामध्ये तो मोठा असल्यामुळे त्यांचा तो दादा होता पण त्यांच्या घरांत त्याच्या वडीलांनंतर तोच जन्माला आल्यामुळे तो लाडोबाही होता. विशेषतः आजीचा! इतक्या वर्षांनी घरात लहान मूल आल्यामुळे तो अगदी छोटा होता तेव्हा जरा लाडाकौतुकातच वाढला होता. कौतुक करावं असं त्याचं रूप, रंग, गुण आणि स्वभावही होता. त्यामुळेच त्याच्या लहानपणच्या खुपशा गोष्टी, खूपशा घटना अजूनही आठवणीत आहेत.

पपा बोलायला शिकला तेव्हा खूपशा वस्तूंना तो मम म्हणायचा. जेवण म्हणजे मम, बटन म्हणजे मम्, हम्मा म्हणजे मम्, चेंडू म्हणजे मम्, बाकीच्या संदर्भावरून त्याच्या मम् चा अर्थ लावावा लागे. त्याला लाकडी चौकोनी ठोकळ्याशी खेळायला खूप आवडत असे. ते ठोकळे तो एकावर एक ठेवी आणि ते खाली पडले की पडले पडले म्हणण्याऐवजी डॉली डॉली म्हणे! तो थोडा मोठा झाल्यावर खूपशा शब्दांना अंगे लावायचा. का कुणास ठाऊक पण हंतरूण अंगे, पांघरूण अंगे आणि त्याच्या ह्या बोलण्याची सगळ्यांना गमत वाटे. मग आणखीच असं काही काही बोलत असे. नवीन उच्चार शिकवितांना त्याला समजा- 'मुंगी' असं शिकविलं की तो त्याच सुरामध्ये 'गुंमी' असं म्हणायचा. कपाटाला पकाट म्हणत असे. पण नंतर जे काही बोलायला लागला ते अगदी स्पष्ट! खरं म्हणजे लहान मुलांचे बोबडे बोल ऐकायला छान वाटतं पण हा बोबडं फारसं बोललाच नाही. शब्दांचे उच्चार तो स्पष्ट करीत असे.

पपाची एक छोटीशी खुर्ची होती. सगळे जण वाचीत बसले की हा

सुद्धा आपलं एखादं पुस्तक घेऊन तिथे बसे. अगदी लहानपणापासून! प्रथम पुस्तकातील चित्र पहायचा आणि नंतर वाचायचा त्याला नाद होता. त्याच्या मनात असलं तर एखादी गोष्ट न कंटाळता चिकाटीने करण्याचा गुण त्याच्या जवळ होता त्यामुळे त्याला खूपशा गोष्टी शिकता आल्या. आत्मसात करता आल्या.



नियमित अभ्यासामुळे आणि अंगच्या हुशारीमुळे वर्गामध्ये त्याचा वरचा - पुष्कळ वेळा तर पहिला नंबर यायचा. परीक्षेच्या वेळी त्याला खूप अभ्यास करावा लागत नसे. एकदा तो आणि त्याचा लहान भाऊ परीक्षा जवळ आली असतांना कंचे खेळत होते. आईने त्यांना सांगितले 'तुम्ही आता कंचे खेळू नका, जरा अभ्यास करा!' आणि पपाच्या लहान भावाला म्हणाली, 'तू तरी अभ्यास कर बाबा! दादांचा कसा पहिला नंबर येतो? तुझा पण यंदा दुसरीच्या वर्गात पहिला नंबर आला पाहिजे.'

त्यावर पपाचा भाऊ बोटाने जोरात कंचा मारीत म्हणाला, 'आई, परीक्षेत मी नापास काही होत नाही तेवढा माझा अभ्यास केव्हाच झालाय. पण पहिला नंबर आला तरी मी दुसरीतून तिसरीत जाणार आणि वरचा नंबर न येता नुसतं पास झालं तरी मी तिसरीतच जाणार ना! मग सांगितलंय

कुणी एवढा अभ्यास करायला.'

त्याचं हे बोलणं ऐकून आईने तर आपल्या कपाळालाच हात लावला त्यावर पपा अगदी मोठेपणाने म्हणाला होता 'अगं आई, ह्याला पहिल्या नंबरचं आकर्षण किंवा कौतुक किंवा अभिमान वाटत नाही. तोपर्यंत त्याला हे सांगण्यात काही अर्थ नाही. तो असाच खेळणार! हाताची पाची बोटे कुठे सारखी असतात का? तसेच भावंडांचे स्वभाव आणि गुण सारखे असतात का?' पपा बरेच वेळा असं मोठया माणसांसारखं गंभीरपणाचा आव आणून बोलत असे.

बाजारांतून भाजी वगैरे आणायचा पपाला फार कंटाळा होता. पण त्याची आई त्या मुलांना अधून मधून भाजी आणायला लावीत असे. पपा पैशाचा हिशोब चोख करी पण कोणती भाजी किती आणायची, कुठून आणायची हे त्याला कळत नसे. आईने यादी दिली तर यादीप्रमाणे तो वस्तू किंवा भाज्या आणीत असे. ज्या भाजीवाल्यासमोर बरेच गिऱ्हाईक असतील तिथून तो भाजी आणायचा कारण त्याचं म्हणणं असं असे की ज्याअर्थी इतके गिऱ्हाईक तिथे गर्दी करताहेत त्याअर्थी तिथे भाजी चांगली असणार किंवा स्वस्त असणारच!' ह्याउलट लहान भावाला भाजी आणायला सांगितली की तो चार दुकानात हिंडून पहात असे. एखादी चांगली भाजी विशेषतः चांगली फळं वगैरे दिसली तर तो यादीत नसली तरी तो आणीत असे.

पपाला एकदा गोवर झाला होता. खूप ताप यायचा चेहरा अगदी लाल झाला होता. पण तो शांतपणे सहन करीत असे. पुढे कांही दिवसांनी त्याला डिप्थेरिया झाला होता. तेव्हाही त्याने जेवणा खाण्याचा हट्ट वगैरे न करता सर्व सहन केले. नाहीतर काही लहान मुलं दुखण्यात मोठयांना खूप त्रास देतात. अगदी अक्षरशः नाचवतात. पण हा त्रास देत नसे. फक्त त्याच्या शेजारी मोठयापैकी कुणीतरी बसलेले त्याला हवं असे.

पपाच्या आईने एकदा त्याला देवाची पूजा करायला सांगितली. थंडीचे दिवस होते. त्याने आईला गरम पाणी मागितले कशाला विचारले तर तो म्हणाला, 'मला देवांना अंघोळ घालायला गरम पाणी हवंय. मी नाही का अंघोळीला गरम पाणी घेत? किती थंडी पडलीय! गार पाण्याने देवांना अंघोळ

घातली तर त्यांना थंडी नाही का वाजणार?' त्यावर आई म्हणाली, 'देवांना नाही वाजत थंडी बिंडी! तू लवकर पूजा आटोपून जेवायला ये बरं! मला उशीर होतोय.

असं आईने म्हणताच तो पूजा करता करता म्हणाला होता 'हे देवांनो, आईने सांगितलंय म्हणून मी तुम्हाला गार पाण्याने अंघोळ घालतोय. खरं म्हणजे मला गरम पाणी हवं होतं. पण आईने मला दिलं नाही. हरकत नाही त्या ऐवजी मी साखर आणि आईने केलेल्या गरम गरम गोड शिऱ्याचा आणखी एक प्रसाद तुम्हाला दाखविणार आहे.' त्याची ही बडबड ऐकून आईला गालातल्या गालात हसू आलं. देवाला फक्त साखर किंवा दूधसाखरे ऐवजी प्रसाद म्हणून श्रीखंड, लाडू, चकली, शंकरपाळे असले पदार्थ असावे असं त्याला वाटे आणि जेव्हा हे पदार्थ घरी केलेले असत तेव्हा तो देवासमोर त्यांचा प्रसाद ठेवीत असे. त्याने आईला तेव्हा गरम शिरा मागितला आणि तो म्हणाला, 'एखादी वस्तू नसली की पुजेमध्ये कसे गुरूजी 'अक्षतां समर्पयामि' म्हणतात. आणि अक्षता वहातात. तसंच गरम पाण्याऐवजी मी गरम शिरा समर्पयामि असं करणार आहे.'

उन्हाळ्यामध्ये पपा आणि त्याच्या घरांतील लोक अंगणात झोपत असत. झाडांच्या फांद्या चवऱ्या हलवाव्या तशा हलत आणि वाऱ्याची मंद झुळुक येई. वरती काळसर निळं आकाश आणि त्यामध्ये चमचमणाऱ्या चांदण्या सुंदर दिसत. कधी अभ्राच्छादित आकाश असे तर कधी स्वच्छ असे. कधी पूर्ण गोल मोठा चंद्र तर कधी बारीकशी चंद्रकोर असे. आकाशात वेगवेगळ्या ढगांचे आकार, वेगवेगळे तारे, आणि म्हातारीचे खाटलं कुठे आणि कसं आहे हे अंथरूणावर पडल्या पडल्या शोधत असतांना मुलांना खूंप कल्पना सुचत अगदी Fantacy मध्ये चपखल बसतील अशा! त्या सांगता सांगता ती गाढ झोपी जात आणि पुढे स्वप्नराज्यात जात. पण तो एक स्वतंत्र विषय होऊ शकेल. पपाच्या लहानपणाच्या अशा अनेक आठवणी आहेत की तो खऱ्या अर्थाने पपा झाल्यावर सुद्धा त्याच्या मुलाला किंवा समवयस्क मुलांना आणि इतरांनाही आठवायला आवडेल.

❋

# पपा शाळेत जातो

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

पपाचा जन्म आक्टोबर महिन्यात तीन तारखेचा! तो जर एक दिवस आधी जन्मला असता तर त्याचं नाव कदाचित मोहन (दास) ठेवलं असतं. शैक्षणिक वर्षाच्यामधे जन्म असल्यामुळे एक वर्षीच्या जुलैमधे शाळेत पहिल्या वर्गात जाण्याच्या दृष्टिने तो वयाने लहान होता आणि नंतरच्या वर्षाच्या जुलैमधे तो मोठा होता म्हणून एक वर्ष त्याने बालकमंदिरातच जावं व नंतर एकदम दूसरीत बसावं असं ठरलं. त्या बालक मंदिरात पहिलीचाही अभ्यास करून घेत असत. अभ्यासात तो हुषार होता. त्याचं पाठांतर छान होतं. तो गणित पटकन आणि बरोबर करीत असे. त्यामुळे तो सहजच दुसरीच्या वर्गात बसला. पण त्या वर्षी त्याच्या बाबांची बदली जबलपूरहून नागपूरला झाली. आणि ह्या गडबडीत तो दुसरीच्या वार्षिक परीक्षेला बसू शकला नाही.

पपाच्या तिमाही, सहामाही परीक्षांचे रिझल्ट आणि मार्क लिस्ट त्याच्याजवळ होती. पण वार्षिक परीक्षेला तो न बसल्यामुळे नवीन गावातील शाळेत तिसरीमध्ये तो बसू शकत नव्हता. शाळेच्या मुख्याध्यापकांना भेटून त्याच्या बाबांनी सर्व परिस्थिती त्यांना समजवून सांगतली तेव्हा जुलैमधे त्याची परीक्षा घेऊन तो पास झाला तर तिसरीमधे त्याला घेऊ असे त्यानी सांगितलं. बरोबर दुसरीचा अभ्यासक्रम (सिलॅबस) दिला आणि असं सांगितलं की तुम्ही कॉलजमधे मुलांना शिकवीत असला तरी ते शिकवणं वेगळं आणि ह्या मुलांकडून दोन महिन्यात परीक्षेची तयारी करून घेणं वेगळं. तुमचा मुलगा तुम्हाला पास व्हायला हवा असेल तर तुम्ही आमच्या शाळेतील त्या वर्ग शिक्षकाची शिकवणी लावा. ते अनुभवी आहेत. त्याची चांगली तयारी करून घेतील. बाबांनी तो अभ्यासक्रम पाहिला तर त्यांना तो कॉलेजमधल्या एखाद्या वर्गापेक्षा ही बिकट वाटला आणि सरळ त्या अनुभवी शिक्षकांची शिकवणी त्याला लावली. त्यांनी खरोखरच पपाची परीक्षेच्या दृष्टीने चांगली तयारी केली आणि तो सहजपणे तिसरीत गेला.

त्या शाळेत तिसऱ्या वर्गात गेल्यावर पपाला वाटायला लागलं की आपण आता खरंच शाळेत जातोय. त्याची उशीरा परीक्षा झाल्यावर तो शाळेत जायला लागल्यामुळे वर्गात जायलाही त्याला उशीर झाला होता. शिक्षक आणि विद्यार्थी त्याला सर्व नवीनच होते. बाकीचे विद्यार्थी परस्परांना ओळखत होते. तो वर्गात येताच चटकन आपल्याजवळ बसायला त्याला कुणी जागा देईना- तो एका मुलाजवळ बसायला गेला तर त्याने आपलं दप्तर तिथे ठेवून जागा अडवून ठेवली. त्याला तिथे बसू दिलं नाही. कदाचित त्याच्या मित्राची ती जागा असेल पण पपाला गोंधळल्यासारखं झालं, रडू यायला लागलं पण मुख्य म्हणजे त्याचा खूप रागही आला. मग तो आणखी पुढे गेला तिथे एका मुलाने त्याला आपल्याजवळ बसायला जागा दिली. त्या मुलाने त्याला म्हटलं, बैस इथे! मला तर वाटलं की तू त्या मुलाला रागाच्या भरात थप्पड वगैरे मारतोस की काय!'

'मला त्याचा इतका राग आला होता की खरंच त्याला एक झापड लगवावीशी वाटली होती पण मी मनात दहापर्यंत अंक मोजले. माझा राग शांत झाला आणि एवढयात तूही मला तुझ्याजवळ बसवलंस'.

वर्गशिक्षक त्या दोघांचे हे बोलणं ऐकत होते. त्यांना इतर मुलांपेक्षा पपामधला वेगळेपणा जाणवला त्यांनी मुलांना म्हटलं.- 'मुलांनो लक्षात ठेवा, तुम्हाला जर राग आला तर ह्या मुलाप्रमाणे मनात दहा अंक मोजत जा. तुमचा राग कमी होईल आणि आतयीपणे कुठलीही गोष्ट तुम्ही करणार नाही.'

पपाला लहानपणी बरेच वेळा राग यायचा, तो बोलायचा नाही पण त्याच्या चेहऱ्यावरून कळायचं की हा रागवला आहे. हाच स्वभाव त्याचा नंतर सुद्धा राहिला.

त्या वर्गात गेल्यावर त्याच्या असं लक्षात आलं की त्याचं गणित चांगलं आहे कारण त्याला पैकीच्या पैकी मार्क मिळत असत. वर्गशिक्षिकेलाही त्याचा अभिमान होता पण हा कधी त्यांच्याशी मोकळेपणाने बोलला नाही. तसा तो बारीक सारीक बाबतीत विसरभोळा होता. शाळेतून घरी येतांना तो मधल्या सुटीतला डबा बरेच वेळा वर्गात विसरून येत असे. मग त्याची

आई त्याला रागवायची. दुसरे दिवशी बाईंना विचार म्हणून सांगितलं तर ते विचारण्याची त्याची तयारी नसे. त्याला तसं विचारण्यात लाज वाटे, कमीपणा वाटे की भीती कुणास ठाऊक पण तो त्यांना विचारीत नसे एवढं मात्र खरं!

शाळेत त्याच्या हेही लक्षात आलं होते की आपण मुलांमध्ये चटकन मिसळू शकत नाही. त्यांच्याशी मोकळेपणाने गप्पा करणं आपल्याला जमत नाही. त्यामुळे मुलं त्याला शिष्ट समजत तर मित्र जोडण्याकरता तो मुलांना कधी-कधी खडू, पेन्सिली, कंचे अशा वस्तू देई त्यामुळे मुलांमधे भांडणं होत आणि आई रागवत असे. पण मनाने तो उदार होता. तो ह्या भांडणाकडे आणि रागवण्याकडे दुर्लक्ष करी.

१ ऑगस्टला टिळकपुण्यतिथीनिमित शाळेत होणाऱ्या कार्यक्रमाकरता त्याला एक भाषण तयार करून दिलं होतं त्यामधे टिळकांची वर्गात शेंगा खाण्याची गोष्ट त्याने सांगितली आणि त्याचं 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हे वाक्य त्याने अतिशय आवेशपूर्ण म्हटलं होतं त्याचं कौतुक झालं होतं. मग घरीही कुणी भेटायला आलं की तो आपलं भाषण घडाघडा म्हणून दाखवायचा आणि अर्थातच मग त्याचं कौतुक व्हायचं. ते भाषण इतके वेळा त्याने घरी सुद्धा म्हणून दाखविलं की आईला त्याचा कंटाळा आला आणि असे प्रत्येकाला ते म्हणून दाखवू नको म्हणून सांगितलं पण त्याकडे त्याने लक्ष दिलं नाही उलट आईने एखादे वेळी त्याच्याकडे लक्ष दिलं नाही तर तो टिळकांवरचं भाषण म्हणीन असं म्हणून लगेच भाषण सुरू करायचा. काही दिवसांनी आपोआप ते बंद झालं.

तिसरीची वार्षिक परीक्षा ही त्याची पहिल्यांदा रीतसर परीक्षा होती. त्यामुळे तो पेपरमधे कसे काय लिहितो त्याची त्याच्या आईबाबांना काळजीच वाटत होती पण त्याला ती मुळीच कठीण वाटली नाही. तो नियमित अभ्यास करीत असे म्हणून परीक्षेच्या वेळी त्याला फारसा अभ्यासही करावा लागला नाही इतकच नाही तर त्याने परीक्षेत चक्क प्रथम क्रमांक पटकाविला.

❋

# पपा किल्ला बांधतो


❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

दिवाळी जवळ आली की पपाचे आणि त्याच्या मित्रांचे किल्ले बांधण्याचे बेत सुरू व्हायचे. तो अगदी छोटा होता तेव्हा तो वाळुमध्ये सुरेख किल्ले बांधायचा. सुरूवातीला पायावर ओलसर वाळु थापून पाय हळूच त्या वाळुतून काढून घेऊन तो चिमचीणा खोपा करीत असे. नंतर तो त्या खोप्याला हळूच गोल-गोल भोकं पाडून खोप्याला खिडकी करायला लागला, घर बांधायला लागला. त्याला व शेजारच्या त्याच्या बरोबरीच्या मुलांना वाळुन खेळायला खूप आवडायचं म्हणून त्याच्या बाबांनी घरासमोच्या अंगणात एका बाजूला वाळुचा एक ढीग मुद्दाम करून ठेवला होता. तिथेही मुलं खूप वेळ रमत असत. कुणी खोपे करीत. कुणी घरं बांधीत. कुणी किल्ले बांधीत तर कुणी खंदक खणीत. पपा थोडासा मोठा झाल्यावर शाळेत जायला लागल्यावर वाळुतल्या किल्ल्याऐवजी दिवाळीला विटामातीचे किल्ले बांधू लागला.

दरवर्षी पपाची किल्ल्याची कल्पना काही वेगळी असे. किल्ल्याच्या भोवती खंदक खणून तो कधी-कधी पलिकडे जंगल करीत असे आणि तिथे खेळण्यातले छोटे-छोटे वाघ, सिंहासारखे प्राणी आणि झाडावर चिमण्या पोपट वगैरे पक्षी ठेवीत असे. कधी कधी चौकोन चौकोन करून त्यामधे गहू, मोहरी वगैरे लावून शेत दाखवीत असे. कधी किल्ल्याच्या भिंती खडर्याने तयार करी तर कधी दगड, विटा व मातीच्या करीत. किल्ला करतांना आतमधे फुटकं घमेलं, डबे, बादल्या वगैरे घालून त्यावर माती लिंपून कुठे तोफा म्हणजे वेगवेगळ्या नळकांडयाचा उपयोग करी. हे किल्ले कधी कधी भुई किल्ले म्हणजे जमिनीवर किंचित उंचवटा करून असत तर कधी कधी गिरीदुर्ग म्हणजे प्रथम मातीचा व दगडांचा डोंगर करून त्यावर केलेले असत.

तेव्हा घरे म्हणजे आजच्या सारखी फ्लट्स पद्धती नव्हती. घराला खालचा व वरचा असे फार तर दोन मजले, क्वचित तिसरा मजला असायचा. घराभोवती अंगण असायचं निदान नागपुरातल्या घरांची तरी अशी परिस्थिती होती. त्यामुळे ह्या मोकळ्या जागेत किल्ला बांधणं शक्य

होई. ह्या मुलांचा किल्ला तयार करण्याचा एक समारंभच असे. पपा, त्याचा लहान भाऊ आणि २-४ मित्र ह्यांची एक चमुच होती. ह्या चमुतील मुलं सगळे मिळून एकमेकांचे व शेजाऱ्यांचेही (त्यांनी विनंती केली तर) किल्ले बांधीत. किल्ला बांधतांना ह्यांचा बराच आरडाओरडा चाले. ते खूप पसारा घालून ठेवीत. कपडे मळवीत. त्यावरून मोठ्यांचे त्यांना रागवणेही होई. परंतु किल्ले बांधतांनाचा त्यांचा उत्साह व त्याना मिळत असलेला



स्वनिर्मितीचा आनंद पाहून बाकीच्या असल्या गोष्टीकडे ते कानाडोळा करीत. किल्ला बांधल्यावर खूप मेहनत झाल्यामुळे त्यांना सपाटून भूक लागे. मग ज्यांच्या घरी किल्ला बांधला जाई त्यांच्याकडे भरपूर खायला करीत असत. आणि सगळे काम झाल्यावर गप्पा करीत करीत ते खात असत.

एकदा पपाने ताणाजी मालुसरेची यशंवती नावाच्या घोरपडीच्या साहायाने कोंडाणा (सिंहगड) किल्ला चढून गेल्याची ऐतिहासिक कथा वाचली. मग घोरपड म्हणजे काय, ती कशी दिसते वगैरे त्याने माहिती मिळविली. वाघासिंहासारखे घोरपडीचं प्लास्टीकचं खेळणं बाजारात कुठे मिळतं का ह्याची चौकशी केली. ते मिळेना पण त्यांना खेळण्यातली एक पाल मिळाली. ती आणून त्याने आपल्या घरी बांधलेल्या किल्ल्यावर घोरपड

म्हणून ठेवली. त्या घोरपडीला एक शिपाई म्हणजे त्याच्या मते एक मावळा कदाचित तानाजी मालुसरे सुद्धा असेल पण एक सैनिक उभा केला. त्याने तो किल्ला आपल्या घरच्या माणसांना दाखविला पण त्यांचं त्या पालीकडे म्हणजे घोरपडीकडे लक्ष गेलं नाही.तशी ती छोटीशीच होती. पण त्याबद्दल कुणीच काही न बोलल्यामुळे त्याचा विरस झाला. मग त्याच्या लहान भावाने बाजारातून सरडयाचं एक मोठं खेळणं आणलं. तो सरडा म्हणजे त्यांच्या मते ती घोरपड किल्ल्याच्या आकाराच्या मानाने विसंगत होती, बरीच मोठी होती. पण त्यांनी ती आणून तिथे ठेवली. किल्ल्याला कोंडाणा असं नावं दिलं आणि मग त्यांच्या त्या कल्पनेचं मोठयांकडून कौतुक झालं. तो किल्ला पाडतांना त्यांनी फटाक्यांऐवजी खेळातल्या ढाल तलवारीचा उयोग आणि हर हर महादेव असा घोष केला.

पपाच्या किल्ल्यांचं एक वैशिष्टय असे तो नेहमी किल्ल्यांत पोकळ जागा ठेवीत असे. दिवाळीनंतर तिथे फटाके उडवून मोठया समारंभाने ते किल्ले उडविले जात.

पपाचा एक शेतीवाला मित्र होता. त्याच्या शेतावरून हुरडा, वांगी वगैरे येत असत. एकदा ही सर्व मुलं त्याच्या शेतावर गेली होती. पण एक वर्षी दिवाळीनंतर ह्या किल्ल्यासमोरच हुरडा पार्टीचा बेत झाला. झाडाच्या काटक्या तोडून अंगणातच चुला केला. तिथल्या फुफाटयात वांगी भाजली हुरडा भाजला. मग त्यांच्या आयांनी त्यांना वांग्याचं भरीत, भाकरी, लसणीची चटणी वगैरे करून दिलं. एकाने आदल्या दिवशी मडक्यामध्ये दही विरजून ठेवायला आपल्या आईला सांगितले होते. ते दही आणलं. पळसाच्या पानाच्या तिथे पत्रावळी आणि द्रोण तयार केले. द्रोणातलं दही चमच्याने न खाता ते हुरडयाच्या पिशीने खातांना त्यांना खूप गमत वाटली. हुरडा आणि भरीत भाकरीचा बेत त्यांना दिवाळीच्या लाडु चकल्यांपेक्षा जास्त आवडला. जेवणानंतर पत्ते, भंडचा वगैरे खेळणं, गप्पा करणं आणि शेवटी किल्ल्यांमध्ये फटाके लावून ते समारंभाने उडवणं झालं.

❋

# पपा कुत्रं पाळतो

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

'आई आपण एक कुत्रं पाळायचे कां?' एक दिवस पपाने आईला विचारलं.

'नको रे बाबा, कुत्रं पाळणं सोपं नाही. त्याचं किती करावं लागतं!, 'आम्ही करू ना'?

'हो आई, आम्ही करू,' पपाच्या भावाने पुस्ती जोडली. 'तुम्ही काय करणार? त्याचं वेळच्या वेळी खाणं पिणं, अंघोळ शी- सू! आजारी पडलं तर औषध पाणी. हे करायला मला मुळीच वेळ नाही. आणि आवडही नाही.'

'तू करूच नकोस, आम्ही सगळं करू. अग, कुत्र्यामुळे कशी घराला शोभा येते. दाराच्या समोर भूं भूं भुंकून तो आपल्या घराची राखण करील. किती छान दिसेल.' पपा म्हणाला.

एवढ्यात बाहेरून भू भू आवाज आला. बाहेर पाहिलं तर त्यांनी एक कुत्र्याचं पिल्लू आणलेलंच होतं. ह्या मुलांकडे पहात शेपटी हलवीत व्हरांडयातून ते आत येत होतं. पपाने त्याला चटकन उचलून घेतलं आणि आईला दाखविलं. गावठी कुत्रंच होतं पण गुबगुबीत असल्यामुळे गोजिरवाणं सुंदर दिसत होतं. दोन्ही मुलांच्या आणि त्या कुत्र्याच्या चेहऱ्याकडे पाहून आईला हो म्हणावंच लागलं. मग त्याच्याकरता बसायला जागा, गळ्यात दोरी, दुधाची बशी, पाण्याचा वाडगा अशी सर्व जमवाजमव केली. त्या दिवशी त्यांचा कितीतरी वेळ त्या पिल्लाशी खेळण्यात गेला.

दुसरे दिवशी सकाळी एक माणूस एका कुत्र्याला घेऊन तिथे आला. तेव्हा ही मुलं त्या पिल्लाशीच खेळत होती. त्या पिल्लाला पाहून तो म्हणू लागला की हे पिल्लू आमचं आहे.' त्यावर पपा त्यांना म्हणाला 'नाही नाही! हे आमचं आहे. तुमच्या मुलाकडून आम्ही ते एक रूपयाला घेतलं आहे. आता ते आमचं आहे.' त्याने त्या पिलाला उचलून घेतलं.

आईला ही भानगड काही माहीत नव्हती. ती त्या माणसाशी काही बोलणार एवढयात ते पिल्लू पपाजवळून त्या माणासाजवळ असलेल्या कुत्रीकडे गेलं. तो कुत्रा नसून कुत्री होती. त्या कुत्रीचं ते पिल्लू होतं. आणि

ती कुत्री त्या माणसाची होती. ते पिल्लू चटकन त्या कुत्रीचं दूध पिऊ लागलं. 'बाई, तुमचा रूपया तुम्ही परत घ्या. पण हे पिल्लू मी नेणार! ही मुलं काहीही कारभार करतात.' तो म्हणाला 'आम्हाला रूपया नको आम्हांला पिल्लूच हवे. तुमच्या मुलाकडून आम्ही ते रीतसर विकत घेतलय' पपा म्हणाला 'अरे त्याला काय कळतंय? तोही तुमच्या एवढाच! तुम्ही मुलांनी आम्हाला न विचारता हे असले कारभार करायचेच नाहीत मुळी. तुम्ही तरी तुमच्या मुलांना सांगा', तो आईकडे पहात म्हणाला त्यावर आई म्हणाली.

'अहो, पण मुलांना ते पिल्लू आवडलंय, राहील आमच्याकडे!' 'पण, मला ते कुणालाही द्यायचं नाही मीच ते पाळणार आहे'. असं म्हणून त्याने एक रूपयाचं नाणं तिथे टाकलं आणि ते पिलू उचलून घेऊन तो निघून गेला. मुलांना खूप वाईट वाटलं पण आई तरी तेव्हा काय करणार होती. ती म्हणाली, 'मोठया माणसांना न विचारता हे कारभार करायला तुम्हाला कुणी सांगितलं होतं. त्या मुलाला एक रूपया देऊन हे पिलू आणलंय असं तुम्ही मला काल सांगितलं नव्हतं. त्याला एक रूपया कुठला दिला?'

'आमच्या पॉकिट मनीमधून! पपाने खाली मान घालून उत्तर दिलं. ते पिल्लू त्या माणसाने नेलं म्हणून त्याला फार वाईट वाटलं. त्याच्याकडे पाहून आई म्हणाली ठीक आहे, हा रूपया तुमचा परत घ्या. आपण दुसरं एखादं कुत्रं आणूं', 'खरंच'? त्या मुलांचा विश्वासच बसेना. खरंच! तुम्हाला आवडतंय ना? खरंच आणू'!

आणि थोडयाच दिवसात एका कुत्रीचा आमच्याकडे यायचा योग आला. बाबांचे एक मित्र होते. त्यांची बदली झाली होती. आणि त्या कुत्रीचं काय करावं हा त्यांच्यापुढे प्रश्नच होता. तो बाबांनी सोडवला. अगदी पटटा साखळीसकट मोनाला बाबा घरी घेऊन आले. हो! त्या कुत्रीचं नाव मोना होतं. ती दिसायला सुरेख, तपकीरी रंगाची, नाजुक होती. मुलांनी तिच्या अंगावरून मायेने हात फिरविला. डोकं कुरवाळलं. त्यांना खूप आनंद झाला. त्यांनी तिला दूध दिलं. ते तिने चटाचटा संपवून टाकलं. पपा आणि त्याचा भाऊ तिला रोज खायला प्यायला देत, फिरायला नेत. स्वच्छ करीत. आईबाबाही तिचे लाड करीत पण एखादे वेळी तिने नको तिथे घाण केली किंवा बागीच्यातली फुलझाडं तुडवली की ते तिला रागवत

आणि वर्तमानपत्राची पुंगळी करून तिला मारल्यासारखं करीत. तिला त्या शिक्षेची कधी कधी गमतच वाटे.

हळूहळू ती कुत्री मोठी होत होती. ती कुत्री म्हणजे मुलांचा अभिमानांचा विषय होती. 'मोना शेक हॅण्ड कर,' 'मोना, बॉल आणून दे', 'खाली बस, उभी रहा', असे त्यांचे हुकुम ती शब्दशः पाळायची. त्यामुळे कुणी आलं की त्यांच्या समोर ही कवायत व्हायची आणि तिचं कौतुक व्हायचे. पपाकडे कुत्रं आहे हे पाहून त्यांच्याकडे येणारी काही माणसं घाबरायची. तशी मोना एकदम कुणाला चावत नसे पण ती जवळ जायची हुंगायची आणि भुंकायची त्यामुळे, काहीजणांना भीती वाटायची. ते बाहेरूनच ओरडायचे. 'जरा कुत्र्याला बांधून ठेवा. आम्हाला आत यायचंय.'

ती कुत्री आणखी मोठी झाली. आजुबाजुचे कुत्रे सारखे अंगणात तिथे येऊ लागले. फाटक बंद असलं तर कम्पाउंडच्या तारांमधून ते येत असत. कधी कधी तीही घरच्याचं लक्ष चुकवून बाहेर जात असे. रात्री कुत्रे अंगणांत जमले की ते गुरगुरत, भांडत आणि जोरजोराने ओरडत. तो एक त्रासच झाला होता. ह्या त्रासापायी त्या मोनाला कुणाला तरी देऊन टाकावी असं पपाच्या आईबाबांना वाटत होतं. पण तिने सर्वांनाच जीव लावला होता. मुलांना तर ही कल्पनाच सहन होत नव्हती. काही दिवसांनी तिला पिल्लं होणार आहेत हे लक्षात आलं. कुत्री पाळली की हे सोपस्कार आलेच. मग तिची आणखी काळजी घेणं सुरू झालं.

एक दिवस सकाळी पपाने उठून पाहयलं तर त्या मोनाला चार पिल्लं झालेली दिसली. त्या पिल्लांचे डोळे मिटलेलेच होते. आणि आईच्या कुशीत ती शांतपणे पहुडली होती. थकलेली मोना त्यांना प्रेमाने चाटीत होती. पपाने मोठया कौतुकाने आपल्या मित्रांना ती पिल्लं पहायला बोलावलं. पण ती मित्राच्या अंगावर गुरगुरू लागली. तिने कोणालाही जवळ येऊ दिलं नाही. फक्त पपा आणि त्याच्या भावाला ती हात लावू द्यायची. त्या पिल्लांना ह्या दोघांनी बाटलीला नीपल लावून दूध पाजले. आठ दिवसांत ती पिल्लं भरकन मोठी झाली. इकडे तिकडे मिरवू लागली. त्यांचा थोडा उपद्रवच व्हायला लागला. त्यांची आठवण म्हणून पपाने आपल्या काकांकडून त्यांचे फोटो काढून घेतले.

चार पिल्लांपैकी दोन कुत्री व दोन कुत्रे होते. दोन कुत्री बाबांनी कुणाकुणाला देऊन टाकल्या. कुत्र्यांपैकी एक काळा कुत्रा छान होता. तो काळा म्हणून पपाने त्याचं नाव ब्लॅकी ठेवलं होतं. त्याचे फोटो काढून अलबममध्ये लावले होते. आतां फक्त ब्लॅकीला सांभाळावं आणि मोना व दुसऱ्या पिल्लाला दुसऱ्या पिल्लाला देऊन टाकावं असं पपाची आई म्हणू लागली. पपाने देऊन टाकलं. पण मोनाला द्यायची त्याची इच्छा नव्हती. पण मोनाचे पूर्वीचे मालक पुन्हा बदलून तिथे आले. त्यांनी मोनाला किंवा ब्लॅकीला तरी द्या म्हणून म्हणताच बाबांनी त्यांच्या मोनाला देऊन टाकलं. पपाला खूप वाईट वाटलं. पण त्यांचा आवडता ब्लॅकी त्यांच्याजवळ होता. त्यांनी मोनासारखंच त्यालाही सर्व शिकविलं.

एक दिवस ब्लॅकी आजारी पडला. त्याला दवाखान्यात नेलं. इंजेक्शन दिलं. औषधं दिलं पण तो लवकर बरा होईना. सारखा ग्लानीतच असायचा. खायला दिलं. तर खाईना, बाटलीने दूध दिलं तरी पिईना, एकदा पपा आणि त्याचा भाऊ शाळेतून घरी आले तर त्यांना ब्लॅकी बागीच्यात अगदी स्वस्थ पडलेला दिसला. त्याच्या अंगावर माशा घोंघावत होत्या. त्यांनी जवळ जाऊन पाहयलं तर ब्लॅकी मेला होता. त्यांनी मेलेलं कुत्रं असं पहिल्यांदाच पाहयलं होतं. आणि जे पाहयलं तो त्यांचा आवडता ब्लॅकी होता. दोघांच्याही डोळ्यातून पाणी आलं होतं. पण तेव्हाच त्यांनी ठरवलं की आता पुन्हा कुत्रं पाळायचं नाही.

❋

# पपा मुलीत लांबोडा

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

पपाला एक छोटी बहीण होती. नागपूरला त्यांच्या घराशेजारी पुष्कळ मुलंमुली होती. ती कधी कधी आपल्या भावांबरोबर मुलांमध्ये खेळायला जात असे पण त्या भावांना ती आपल्याबरोबर आलेली आवडत नसे. ती लहान

होती त्यामुळे तिच्याकडे त्यांना लक्ष ठेवावं लागे. मनात येईल तिथे चटकन जाता येत नसे. पपा आणि त्याचा धाकटा भाऊ आपल्या ह्या बहीणीला



येऊ नको म्हणून सांगून पहात पण ती ऐकत नसे. मग ह्या भावांनी तिला चिडविण्याची नवीनच टूम काढली. ते तिला चिडवायला लागले-

***मुलात मुलगी लांबोडी***

***भाजून खाते कोंबडी***

असं चिडविल्यामुळे ती त्यांच्याबरोबर जाईनाशी झाली आणि मुलींकडे जाऊ लागली. ह्या मुलींकडे भुलाबाई मांडीत असत. भाद्रपद पोर्णिमेपासून कोजागिरी पोर्णिमेपर्यंत महिनाभर भुलाबाईची गाणी म्हणण्याची फार जुनी पद्धत होती पण तेव्हा कोजागिरी पौर्णिमेच्या आधी कुणाकडे पंधरा दिवस, कुणाकडे आठ दिवस तर कुणाकडे फक्त तीन दिवस भुलोबा आणि भुलाबाई म्हणजे शंकरपार्वतीच्या मूर्ती मांडून त्यांच्या भोवती आरास करीत. फेर धरून किंवा जवळ जवळ बसून टिपऱ्या किंवा टाळ्या वगैरे वाजवून भुलाबाईची गाणी म्हणत असत. ही बहीण त्यांच्याकडे जात असे व ऐकून ऐकून तिचीही गाणी पाठ झाली होती.

*पहिली ग भुलाबाई देवा देवा साजे*

*घातिला मंडपा खेळ खेळ खंडोबा*

*खंडोबाच्या नारी बाई वणीवणी अवसनं*

*अवसनेचं पाणी तसं गंगेचं पाणी।*

अशी खूप खूप गाणी म्हणत असत. पपाच्या आईनेही पपाच्या बहिणीकरता एकदा आठ दिवसाची भुलाबाई मांडली, छान आरास करून दिली. तिच्याकडे शेजारच्या मुली गोळा होऊन भुलाबाईची गाणी जोराजोराने म्हटली जाऊ लागली की पपा, त्याचा भाऊ आणि काही मित्र तिथे जमत आणि, त्यांच्या गाण्याची नक्कल करीत. त्यांनी

*'एक लिंबू झेलू बाई दोन लिंबू झेलू*

*दोन लिंबू झेलू बाई तीन लिंबू झेलू*

असं म्हणायला सुरूवात केली की ह्या मुलांची दहा पंधरापर्यंत लिंबू झेलणं आणि गाणी म्हणणं सुरू व्हायचं. भुलोजीच्या मुलाला नाव ठेवण्याचं गाणं तर त्यांना फार आवडायचं त्या मुली म्हणायच्या-

*अडकीत जाऊ खिडकीत जाऊ*

*खिडकीत होता बत्ता*

*भुलोजीला मुलगा झाला*

*नाव ठेवा दत्ता।*

*नंतर त्या पुढे म्हणत असत*

*भिंतीला लावलं कॅलेण्डर*

*भुलोजीला मुलगा झाला*

*नाव ठेवा अलेक्झांडर*

ह्या भुलोजीच्या मुलाकरता अलेक्झांडर नाव कुणी शोधून काढलं होतं कुणास ठाऊक पण यमक छान जुळत असल्यामुळे अशी वेगवेगळी नावं असलेली गाणी त्या म्हणत मग मुलं सुद्धा मध्येच आपलं गाणं मोठयाने म्हणत-

*अडकीत जाऊ खिडकीत जाऊ*

*खिडकीतून आला वारा*

**भुलोजीला मुलगी झाली**

***नाव ठेवा तारा।***

त्या मुलीमध्ये तारा नावाची एक मुलगी होती. त्यांनी हे गाणं म्हटलं की ती खूप चिडायची. तिनेही त्यांना मग चिडविणं सुरू केलं.

***मुलीत मुलगा लांबोडा***

***भाजून खातो कोंबडा***

अर्थात ह्या चिडविण्याचा त्यांच्यावर फारसा परिणाम झाला नाही. कारण त्यांना नंतरची खिरापत हवी असायची म्हणून ते तिथेच घुटमळत असत. खिरापतीचा डबा वाजवून ती कशाची खिरापत आहे ते ओळखायचं असे. नंतरच सर्वांना ती देण्यात येई. एकदा पपाने त्याच्या बहिणीने केलेली खिरापत हळूच एका मुलीला सांगून ठेवली. तिला वाटलं होतं की आपली ही खिरापत कुणाला चटकन ओळखता येणार नाही पण तिने डबा एकदा हलवताच त्या मुलीने चटकन ओळखलं. नंतर तिला कळलं की आपल्या दादानेच तिला हे आधी सांगितलं होतं. तेव्हा ती दादावर म्हणजे पपावर खूप रागवली होती आणि त्याला ती खिरापत दिली नव्हती. अर्थात त्याने नंतर ती आईकडून घेतली ती गोष्ट वेगळी!

काही काही वेळा ही मुलंमुली एकत्र खेळत असली तरी काही खेळामध्ये त्यांनी लुडबुड केलेली त्यांना आवडत नसे. दोरीवरच्या उडया मारतांना किंवा टिक्करबिल्ला खेळतांना जर ही भावंडं मधे मधे करू लागली तर त्या मुली त्यांना चिडवून म्हणत-

***मुलीत मुलगा लांबोडा***

***भाजून खातो कोंबडा।***

BVBK-0402807

म. वं. वं. ठाणे, वाचनालय शाखा.
...
२८०८ ९१८१८३
बा.वा.